अंतरंग

महाराष्ट्र महान राज्य; राष्ट्रपतींकडून कौतुक/२

रायगडात भटक्या श्वानांची दहशत कायम/५

नेदरलँड्सला वर्ल्डकपचे तिकिट; स्कॉटलंडवर मात/८



रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १५ ◆ अंक ३५०

www.ramprahar.com

शनिवार, ८ जुलै २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२



।। विद्या विनयेन शोभते ।।

Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha's

CHANGU KANA THAKUR

Arts, Commerce and Science College, New Panvel (Autonomous)

Dr. C. D. Deshmukh Centre for Administrative Services

७५,००० पदांची भरती

स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र

तलाठी मार्गदर्शन शिबीर

आणि

ग्रामसेवक

कृषिसेवक

आरोग्यसेवक

पोलीस भरती

जिल्हापरिषदेमधील

व इतर सरळसेवा

CONTACT: 9833177551/9223555779 | WEBSITE: www.ckthakurcollege.net


# ठाकरे गटाची गळती सुरूच!

## नीलम गोऱ्हेंचा 'जय महाराष्ट्र'; शिवसेनेत दाखल

**मुंबई : प्रतिनिधी**

उद्धव ठाकरे गटाला पुन्हा एकदा मोठा धक्का बसला आहे. अलिकडेच आमदार मनीषा कायंदे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात शिवसेनेत प्रवेश केला. त्यामुळे ठाकरे गटाच्या महिला आघाडीतील वाद चव्हाट्यावर आले होते. त्यानंतर आता विधान परिषदेच्या उपसभापती असलेल्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनीदेखील शुक्रवारी (दि. ७) मुख्यमंत्री शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला. गोऱ्हे यांच्या पक्षप्रवेशामुळे ठाकरे गटाला जोरदार धक्का बसल्याचे मानले जाते.



नीलम गोऱ्हे यांनी शिवसेनेत प्रवेश केल्यानंतर राज्य सरकारच्या कामाचे कौतुक करून आपण प्रवेश का करीत आहोत, हे एका पत्रकातून सांगितले आहे तसेच बाळासाहेबांच्या विचारांची भूमिका घेऊन ही शिवसेना पुढे जात असून हीच खरी शिवसेना असल्याचे त्यांनी म्हटले. सुषमा अंधारेंबद्दल प्रश्न विचारला असता सटरफटर लोकांमुळे पक्षातील नेत्यांमध्ये नाराजी नसते, असेही गोऱ्हे यांनी सांगितले.

गेल्या वर्षी जून महिन्यात एकनाथ शिंदे आणि समर्थक आमदारांनी उद्धव ठाकरेंविरोधात भूमिका घेत भाजपला पाठिंबा दिला. शिवसेनेतील बहुतांश आमदार मुख्यमंत्री शिंदेंसोबत गेले. जवळपास ४० आमदारांनी पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंविरोधात जात शिंदेंचे नेतृत्व स्वीकारले. त्यानंतर राज्यभरात पदाधिकारी आणि शिवसैनिकही शिंदेंसोबत जात होते. त्या वेळी सुषमा अंधारे यांनी ठाकरे गटात प्रवेश केला. अंधारे यांच्या पक्षप्रवेशानंतर ठाकरे गटातील महिला आघाडीत वाद सुरू झाले. अंधारेंना दिले जाणारे महत्त्व अनेकांना रूचले नाही. त्यातून नाराज होत अलिकडेच मनीषा कायंदे यांनी शिंदेंच्या नेतृत्वात शिवसेनेत प्रवेश केला होता.



# राष्ट्रवादीत कोणतीही फूट नाही, बहुमत अजित पवारांसोबत!

## ज्येष्ठ नेते प्रफुल्ल पटेल यांचा दावा

**मुंबई : प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात फूट पडलेली नसून बहुमत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे आहे. त्यामुळे आमच्यावर अपात्रतेची कारवाई लागू नसल्याचे ज्येष्ठ नेते प्रफुल्ल पटेल यांनी शुक्रवारी (दि. ७) पत्रकार परिषदेत स्पष्ट केले. राष्ट्रवादीच्या संविधानानुसार जयंत पाटील यांचे प्रदेशाध्यक्षपद अधिकृत नसल्याचेही या वेळी पटेल यांनी सांगितले.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासंदर्भात चुकीची माहिती आणि संभ्रम पसरवण्यात येत आहे. खरी परिस्थिती लोकांना कळावी यासाठी पत्रकार परिषद आयोजिल्याचे सांगून प्रफुल्ल पटेल म्हणाले की, ३० जून रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची महत्त्वाची बैठक 'देवगिरी'ला झाली. या बैठकीला नेते, आमदार, पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. बैठकीत सर्वानुमते अजित पवार यांना आपला नेता म्हणून निवडण्यात आले. या वेळी त्यांनी मला (प्रफुल्ल पटेल) राष्ट्रीय कार्यकारी अध्यक्ष म्हणून नियुक्त केले. त्यानंतर अजित पवार हे विधीमंडळाचे नेते आहेत हे मी सूचित केले. पक्ष म्हणून अनिल पाटील यांना प्रतोद म्हणून मी माझ्या सहीने नियुक्त केले. अमोल मिटकरी यांना प्रतोद म्हणून नियुक्त करीत असल्याचे त्याचवेळी आम्ही विधान परिषद सभापतींना कळविले.

प्रफुल्ल पटेल पुढे म्हणाले की, जयंत पाटील यांनी अजित पवार आणि आठ आमदारांवर निलंबनाची कारवाई केली, पण आमच्या पक्षाच्या संविधानानुसार ते अध्यक्ष नाहीत. त्यामुळे त्यांना हा अधिकार नाही. राजकीय पक्ष कोण हे निवडणूक आयोग ठरवू शकतो. आमच्या याचिकेवर निर्णय होईपर्यंत या कारवाईला काहीही अर्थ नाही तसेच मूळ राष्ट्रवादी पक्ष आम्हीच आहोत, कारण आमच्याकडे आमदारांचे जास्त बळ आहे. ३० तारखेला प्रतिज्ञापत्रासह सगळी प्रक्रिया आम्ही पूर्ण केली आहे. निवडणूक आयोग आता त्यावर निर्णय घेणार आहे.

# राज ठाकरेंनी घेतली मुख्यमंत्री शिंदेंची भेट

**मुंबई** : महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी शुक्रवारी (दि. ७) मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची त्यांच्या वर्षा निवासस्थानी भेट घेतली. ही पूर्वनियोजित भेट होती तसेच वैयक्तिक कामासाठी राज ठाकरे 'वर्षा'वर गेल्याचे सांगितले जात आहे.



ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी शुक्रवारी सकाळीच उद्धव ठाकरे व राज ठाकरे यांच्या युतीबाबत प्रतिक्रिया दिली होती. दोन्ही भावांमध्ये रक्ताचे नाते आहे, त्यांना एकत्र आणण्यासाठी इतर कुणाची गरज नाही, अशा आशयाचे विधान राऊतांनी केले होते. त्यामुळे येत्या काळात ठाकरे बंधू पुन्हा एकत्र दिसतील, असे बोलले जात होते, पण राज ठाकरे यांनी मुख्यमंत्री शिंदे यांची भेट घेतली. तत्पूर्वीच गुरुवारी राज यांनी मनसेकडून ठाकरे गटाला युतीसाठी कोणताही प्रस्ताव दिला नसल्याचे स्पष्ट केले होते.

# पंकजा मुंडेंकडून काँग्रेस प्रवेशाच्या चर्चांचे खंडन

**मुंबई : प्रतिनिधी**



राहुल गांधी, सोनिया गांधी यांना आपण कधीही भेटलो नाही. त्यांना कधी प्रत्यक्ष पाहिलेलेही नाही, असे म्हणत भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजा मुंडे यांनी काँग्रेस प्रवेशाच्या चर्चांचे खंडन केले आहे.

दीनदयाळ उपाध्याय, अटलबिहारी वाजपेयी यांच्या संस्कारांसाठीच आयुष्यभर झटत राहणार, असे स्पष्ट करून त्यांनी आपल्याला ब्रेकची आवश्यकता असून दोन महिने ब्रेक घेणार असल्याचे सांगितले.

# गडचिरोलीत आज 'शासन आपल्या दारी'

## मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांची लाभणार उपस्थिती

**मुंबई : प्रतिनिधी**

गडचिरोलीत शनिवारी (दि. ८) शासन आपल्या दारी उपक्रम मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत होणार आहे. गडचिरोली शहरालगतच्या कोटगल एमआयडीसीच्या क्रीडांगणावर हा कार्यक्रम होणार असून या वेळी जिल्ह्यातील लाभार्थ्यांना विविध योजनांचे लाभ, दाखल्यांचे वितरण केले जाणार आहे.

सर्वसामान्यांची कामे सुलभरित्या व स्थानिक पातळीवर होणे आवश्यक असते. हेच लक्षात घेऊन नागरिकांना विविध योजनांचे लाभ मिळावेत यासाठी शासन थेट जनतेच्या दारी जात आहे. यामुळे नागरिकांना शासनाच्या इतरही योजनांचा लाभ घेणे सोयीस्कर झाले आहे. यातून योजनांची लोकाभिमुखता, पारदर्शकता वाढली आहे.

## निवडक

### राहुल गांधींना धक्का! गुजरात न्यायालयाने फेटाळली याचिका

**गांधीनगर** : काँग्रेस नेते राहुल गांधी यांना गुजरात उच्च न्यायालयाने मोठा झटका दिला आहे. मोदी आडनावाबद्दल केलेल्या विधानावरून राहुल यांना सुरत सत्र न्यायालयाने दोन वर्षांची शिक्षा सुनावली होती. यावर त्यांनी गुजरात उच्च न्यायालयात धाव घेतली होती, मात्र ही याचिका शुक्रवारी (दि. ७) उच्च न्यायालयाने फेटाळली. त्यामुळे राहुल यांच्यावर अटकेची टांगती तलवार आहे.

### खराब हवामानामुळे अमरनाथ यात्रा स्थगित

**श्रीनगर** : जम्मू-काश्मीरमधील खराब हवामानामुळे अमरनाथ यात्रा शुक्रवारी (दि. ७) पुढील आदेश येईपर्यंत स्थगित करण्यात आली आहे. हवामान सुधारल्यानंतर यात्रा पुन्हा सुरू होईल.

### रायगडचे पर्जन्यमान

**२४ तासांतील पाऊस : ६३.०१ मिमी**
**एकूण पाऊस : ८०७.२ मिमी**

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची घोषणा नाही!

## राज्य निवडणूक आयोगाचे स्पष्टीकरण





**मुंबई : प्रतिनिधी**

राज्य निवडणूक आयोगातर्फे ५ जुलै रोजी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसंदर्भातील मतदार यादीबाबतची (कट ऑफ डेट) अधिसूचना प्रसिद्ध केली आहे. त्यात प्रत्यक्षात कोणत्याही निवडणूक कार्यक्रमाची घोषणा करण्यात आलेली नाही. शिवाय ग्रामपंचायत निवडणूक वगळता अन्य सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत सर्वोच्च न्यायालयाने 'जैसे थे चे' आदेश दिले आहेत. त्यामुळे निवडणूक कार्यक्रमाची घोषणा करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही, असे स्पष्टीकरण राज्य निवडणूक आयुक्त यू. पी. एस. मदान यांनी दिले आहे.

पुढे बोलताना निवडणूक आयुक्त मदान यांनी सांगितले की, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी स्वतंत्र मतदार याद्या तयार करण्यात येत नाहीत. त्यासाठी विधानसभा मतदारसंघांच्या मतदार याद्या जशाच्या तशा घेऊन केवळ प्रभागनिहाय विभाजित केल्या जातात. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी संभाव्य सर्वच सार्वत्रिक आणि पोटनिवडणुकांसाठी विधानसभा मतदारसंघांच्या याद्या वापरण्याकरिता एक विशिष्ट तारीख (कट ऑफ डेट) निश्चित केली जाते. त्याच धर्तीवर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी संभाव्य सार्वत्रिक आणि पोटनिवडणुकांसाठी १ जुलै २०२३ ही कट ऑफ डेट निश्चित करण्याबाबतची अधिसूचना ५ जुलै रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे. **(पान २ वर..)**

# विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन १७ जुलैपासून

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्य विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन १७ जुलै ते ४ ऑगस्ट या कालावधीत मुंबई येथे होणार आहे. याबाबतची घोषणा विधानसभा कामकाज सल्लागार समितीच्या शुक्रवारी (दि. ७) झालेल्या बैठकीत विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांनी, तर विधान परिषद कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी केली.

विधानभवनात झालेल्या या बैठकीस मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, संसदीय कार्यमंत्री चंद्रकांत पाटील यांच्यासह विधानसभा सदस्य छगन भुजबळ, जयंत पाटील, बाळासाहेब थोरात, गिरीष महाजन, अशोक चव्हाण, उदय सामंत, अमिन पटेल, आशिष शेलार, नरहरी झिरवाळ तसेच



विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्यासह विधान परिषद सदस्य ॲड. अनिल परब, प्रवीण दरेकर, प्रसाद लाड, शशिकांत शिंदे, विकास पोतनीस, कपिल पाटील, रणजितसिंह मोहिते-पाटील, संसदीय कार्य विभागाचे सचिव सतीश वाघोले, विधानसभा सचिवालयाचे सचिव जितेंद्र भोळे, विलास आठवले, वित्त विभागाच्या सचिव शैला ए. यांच्यासह संबंधित उपस्थित होते.

विधिमंडळाच्या शतकोत्तर प्रवासाच्या पार्श्वभूमीवर विधिमंडळ वाटचालीचे दस्ताऐवजीकरण करण्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या वेळी सूचित केले. विधिमंडळाचा गौरवशाली इतिहास संदर्भग्रंथाच्या माध्यमातून जतन करण्याचे तसेच विविध परिसंवादाद्वारे विधिमंडळाच्या आजपर्यंतच्या कामकाजातून महत्त्वपूर्ण घटना, प्रसंगांना उजाळा देणाऱ्या उपक्रमांचे आयोजन करण्याची उपसभापती डॉ. गोऱ्हे यांनी सूचना मांडली.

मराठवाडा मुक्तीसंग्राम अमृत महोत्सवानिमित्तच्या पार्श्वभूमीवर अभिनंदनाचा ठराव अधिवेशनाच्या पहिल्या आठवड्यात सादर करण्याबाबत जयंत पाटील, अशोक चव्हाण, बाळासाहेब थोरात यांनी मांडलेल्या सूचनेवर अध्यक्ष ॲड. नार्वेकर यांनी या वेळी संमती दर्शवत ठराव मांडण्याचा निर्णय घेतला. १७ ते ४ ऑगस्ट या १९ दिवसांच्या कालावधीतील अधिवेशनाचे प्रत्यक्ष कामकाजाचे दिवस १५ असून चार दिवस सार्वजनिक सुट्यांचे (शनिवार, रविवार) असणार आहेत.

# ओडिशा रेल्वे अपघात

## तीन अधिकाऱ्यांना सीबीआयकडून अटक

**भुवनेश्वर : वृत्तसंस्था**

ओडिशातील बालासोरमध्ये झालेल्या रेल्वे अपघातप्रकरणी सीबीआयने शुक्रवारी (दि. ७) मोठी कारवाई करीत रेल्वेच्या तीन अधिकाऱ्यांना अटक केली आहे. आरोपींमध्ये सीनियर सेक्शन इंजिनिअर अरुण कुमार महांतो, सीनियर सेक्शन इंजिनिअर मोहम्मद आमिर खान आणि टेक्निशियन पप्पू कुमार यांचा समावेश आहे.

मागील महिन्यात २ जून रोजी सायंकाळी ७च्या सुमारास तीन रेल्वेगाड्यांचा भीषण अपघातात २९२ प्रवाशांचा मृत्यू, तर एक हजारांहून अधिक प्रवासी जखमी झाले होते. आरोपींविरोधात भारतीय दंड विधान कलम ३०४ आणि कलम २०१ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# स्वस्तिका घोषची पुन्हा आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये चमक

## दोन रौप्यपदकांना गवसणी; लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते सत्कार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नार्कोटिक बोर्ड ऑफ रिपब्लिक ऑफ इंडोनेशियाच्या वतीने आयोजित इंटरनॅशनल टेबल टेनिस चॅम्पियनशिप २०२३ तसेच इंडोशियन क्लब लीग सेशन या दोन्ही स्पर्धांमध्ये पनवेलच्या स्वस्तिका घोष हिने महिला एकेरी खुल्या गटात रौप्यपदक पटकावित भारताच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. त्याबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते स्वस्तिकाचा सत्कार करण्यात आला.

या वेळी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य अनिल भगत, हरिश्चंद्र पाटील, स्वस्तिकाचे वडील संदीप घोष उपस्थित होते.



नार्कोटिक बोर्ड ऑफ रिपब्लिक ऑफ इंडोनेशियाच्या वतीने बाली येथे इंटरनॅशनल टेबल टेनिस चॅम्पियनशिप २०२३ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत चीन, जपान, कोरिया, मलेशिया, इंडोनेशिया, थायलंड, सिंगापूर या देशातील दिग्गज खेळाडूंनी सहभाग घेतला. स्पर्धेत भारताकडून पनवेल येथील स्वस्तिका घोषने प्रतिनिधित्व केले. तिने दमदार खेळी करीत अंतिम फेरी गाठली व रौप्यपदकाला गवसणी घातली.

स्वस्तिकाचा चमकदार खेळ पाहता थेट इंडोशियन क्लब लीग सेशन स्पर्धेसाठी तिची निवड करण्यात आली. विशेष म्हणजे ही स्पर्धा खेळणारी स्वस्तिका भारताची पहिली महिला खेळाडू ठरली. यामध्येही तिने आपल्या नेत्रदीपक कामगिरी आणि आक्रमक शैलीच्या जोरावर अंतिम फेरी गाठली. अंतिम सामन्यात तिने ३-४, २-३ने सेट स्कोअर गमावला. त्यामुळे या स्पर्धेतही ती रौप्यपदकाची मानकरी ठरली.

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये स्वस्तिकाने इयत्ता तिसरी ते बारावीपर्यंत शिक्षण घेतले. त्यानंतर आता ती खांदा कॉलनी येथील सीकेटी महाविद्यालयात (स्वायत्त) बीएमएसचे शिक्षण घेत आहे. स्वस्तिकाने देशात व परदेशात झालेल्या टेबल टेनिस स्पर्धेत चमकदारी कामगिरी करीत देशाचे नाव उंचाविले आहे. तिने लहानपणापासून टेबल टेनिस खेळात आपली आवड व नैपुण्य दाखविले आहे. त्यामुळे तिला विराट कोहली फाऊंडेशनकडून स्कॉलरशिप प्राप्त झाली आहे. या संस्थेद्वारे स्कॉलरशिपसाठी निवडली गेलेली ती भारतातील एकमेव टेबल टेनिस खेळाडू आहे. टेबल टेनिससाठी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी तिला वेळोवेळी आर्थिक मदत करण्याबरोबरच प्रशिक्षणासाठी खारघर येथील विद्यालयात विशेष सोय केली आहे. स्वास्तिकाचे वडील संदीप घोष हे या खेळातील प्रशिक्षक आणि सल्लागार आहेत.

# साथरोग नियंत्रणासाठी आरोग्य विभाग सज्ज

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यात पावसाळा सुरू झाला आहे. प्रत्येक जिल्ह्यामध्ये कमी-अधिक प्रमाणात पाऊस होत आहे. पावसाळ्यात उद्‌भवणाऱ्या साथ रोगांवर प्रभावी नियंत्रणासाठी आरोग्य विभाग सज्ज झाला आहे. साथरोग नियंत्रणासाठी विविध उपाययोजना आरोग्य विभागाने केल्या आहेत.

गडचिरोली, चंद्रपूर, गोंदिया या जिल्ह्यांमध्ये हिवताप तसेच विदर्भातील अन्य जिल्ह्यांमध्ये जपानी मेंदूज्वर, चंडीपुरा मेंदूज्वर, तर कोकणात लेप्टो स्पायरोसिस, शहरी भागात डेंग्यू अशा विविध आजारांच्य साथी पसरतात. विभागाने प्रत्येक जिल्ह्यात जोखीमग्रस्त गावांची निवड करून त्यांची यादी तयार केली आहे. जिल्हा व तालुकास्तरावर शीघ्र प्रतिसाद पथकांची स्थापना करण्यात आली आहे. या शीघ्र प्रतिसाद पथकातील वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांचे प्रशिक्षण घेण्यात आले आहे. या पथकांमध्ये राज्यात चार हजार १८० वैद्यकीय अधिकारी व १९ हजार १७१ कर्मचारी असणार आहेत. राज्यात चार हजार ६७ गावे जोखीमग्रस्त असून सर्वांत जास्त कोल्हापूर जिल्ह्यात ४११ गावे जोखीमग्रस्त आहेत, तर धुळे, मुंबई जिल्ह्यात एकही गाव जोखीमग्रस्त नाही.

प्रत्येक आरोग्य कर्मचाऱ्यांचे पंधरवडा सर्वेक्षण कॅलेंडर तयार करण्यात आले आहे. दैनंदिन सर्वेक्षणासाठी करावयाच्या गृहभेटीच्या वेळी जलजन्य व कीटकजन्य आजारांच्या रुग्णांचा शोध घेण्यात येतो. जिल्ह्यातील आश्रमशाळा, वसतिगृह, वृद्धाश्रम अशा संस्थांना वैद्यकीय अधिकारी आणि आरोग्य कर्मचारी नियमित भेटी देतात. जलजन्य आजारांच्या प्रभावी प्रतिबंधासाठी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या कार्यक्षेत्रातील पाणी स्त्रोतांचे प्रभावी गुणवत्ता नियंत्रण करण्यात येत आहे. विरंजक चुर्णाचा साठा पुरेशा प्रमाणात उपलब्ध करून देण्यात आला आहे. राज्यात ७६ हजार ८६७ पाणी नमुने तपासण्यात आले असून त्यामध्ये ३५८० पाणी नमुने दूषित आढळले आहे. **(पान २ वर..)**

### जलस्त्रोतांचा सॅनिटरी सर्व्हे

दरवर्षी मान्सूनपूर्व सर्व पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांचा सॅनिटरी सर्व्हे करण्यात येतो. त्यानुसार प्रत्येक गावाला हिरवे, पिवळे व लाल कार्ड दिले जाते. त्यानुसार राज्यात २७ हजार ८५३ गावांचा सर्व्हे करण्यात आला आहे. यामध्ये हिरवे कार्ड दिलेली गावे २४ हजार १३९ असून पिवळे कार्ड दिलेली गावे तीन हजार ६७५ आणि लाल कार्ड दिलेली गाव ३९ आहेत.

# सुधारित वाळू धोरणाची अंमलबजावणी करा

## महसूलमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांचे निर्देश

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यात सुधारित वाळू धोरण तयार करण्यात आले असून त्याच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने तातडीने कार्यवाही करावी, असे निर्देश महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी मंत्रालयात आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत दिले. सुधारित वाळू धोरणासंदर्भात सद्य:स्थितीचा विभागनिहाय आढावा गुरुवारी (दि. ६) मंत्रालयात आयोजित बैठकीत घेण्यात आला.



या बैठकीस महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव राजगोपाल देवरा, सहसचिव रमेश चव्हाण, माधव वीर, उपसचिव अजित देशमुख यांच्यासह राज्यातील सर्व विभागीय आयुक्त, सर्व जिल्हाधिकारी दूरदृश्यप्रणालीद्वारे उपस्थित होते.

या वेळी मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील म्हणाले की, लोकांना स्वस्तात वाळू मिळाली पाहिजे, असा सुधारित धोरणाचा उद्देश आहे. या धोरणामुळे महसूल स्वरूपात स्वामित्व धन (रॉयल्टी) वर्षाला मिळत होती ती आज महिन्याला मिळत आहे. सामान्य लोकांना या धोरणाचा मोठ्या प्रमाणात लाभ होत आहे.

राज्यातील सर्व जिल्ह्यांतील वाळू डेपोंची तपासणी करून पुढील पंधरा दिवसांत सर्व वाळू डेपो चालू झाले पाहिजेत याकडे लक्ष द्यावे, असे निर्देश त्यांनी या वेळी अधिकाऱ्यांना दिले.

रेती घाट चालू होण्यासाठी पर्यावरण विभागाच्या अनुमतीअभावी काही घाट प्रलंबित आहेत. त्याबाबत तातडीने कार्यवाही करून रेती घाट सुरू करण्यात यावे, असेही ते म्हणाले.

काही ठिकाणी जलसंपदा विभागाचे सहकार्य आवश्यक आहे, याबाबत संबंधित विभागाच्या कार्यकारी अभियंता यांच्याशी संपर्क साधून अडचणी दूर कराव्यात.

अनधिकृतरित्या वाळूउपसा करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात यावी, असे निर्देश मंत्री विखे-पाटील यांनी सर्व विभागीय आयुक्त व जिल्हाधिकाऱ्यांना दिले.

### अधिकाऱ्यांनी रूजू व्हावे!

वाळू धोरणाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने बदली झालेल्या अधिकाऱ्यांपैकी ३३ अधिकारी अजूनही रूजू झालेले नाहीत. याबाबत विभागीय आयुक्त यांनी संबंधित अधिकारी यांना तातडीने हजार होण्याबाबत नोटीस जारी करावी. सर्व अधिकाऱ्यांनी त्वरित हजर व्हावे, अशा सूचनाही मंत्री विखे-पाटील यांनी दिल्या. राज्यात पदभरतीच्या अनुषंगाने कार्यवाही सुरू आहे. याबाबत मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत आहे, असेही त्यांनी सांगितले.

## विद्यापीठाने परीक्षेचे निकाल वेळेत जाहीर करावेत -ना. चंद्रकांत पाटील

**मुंबई : प्रतिनिधी**



विद्यार्थ्यांना पुढील अभ्यासक्रमाच्या प्रवेशाला अडचणी येऊ नयेत म्हणून सर्व अकृषी विद्यापीठांनी परीक्षेचे निकाल वेळेत जाहीर करावेत, अशा सूचना उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिल्या.

मंत्रालयात मंत्री श्री. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठातील परीक्षा आणि निकाल याबाबत आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. त्या वेळी ते बोलत होते.

या बैठकीला उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष आयुक्त महेंद्र वारभुवन, उपसचिव अजित बाविस्कर, उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर, राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठाचे संबंधित अधिकारी उपस्थित होते.

मंत्री पाटील म्हणाले की, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेशाबाबत संभाव्य वेळापत्रक जाहीर केलेले असते. त्यानुसार विद्यार्थी प्रवेशाचे नियोजन करतात. या पार्श्वभूमीवर पदवी परीक्षेचे निकाल वेळेत जाहीर होणे गरजेचे असते. निकाल वेळेत जाहीर झाले नाहीत, तर विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊन त्यांना ज्या अभ्यासक्रमाला प्रवेश घ्यावयाचा असतो त्या अभ्यासक्रमापासून वंचित राहण्याची शक्यता नाकारता येत नाही.

या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान आणि त्यांचा वेळ वाया जाऊ नये यासाठी सर्व अकृषी विद्यापीठांनी विद्यार्थी हितासाठी वेळेत निकाल जाहीर होतील याचे नियोजन करून पुढील शैक्षणिक वर्ष वेळेत सुरू करावे, अशा सूचनाही मंत्री पाटील यांनी या बैठकीत दिल्या.

## मध्य रेल्वेच्या चार कर्मचाऱ्यांना महाव्यवस्थापक सुरक्षा पुरस्कार

**रोहे : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक नरेश ललवानी यांनी मध्य रेल्वेच्या चार कर्मचाऱ्यांना म्हणजे मुंबई, भुसावळ, नागपूर आणि सोलापूर विभागातील प्रत्येकी एक कर्मचाऱ्याला महाव्यवस्थापक सुरक्षा पुरस्कार प्रदान केला. उपस्थित मान्यवरांनी या कर्मचाऱ्यांच्या कामगिरीचे कौतुक केले.

या वेळी आलोक सिंग, अतिरिक्त महाव्यवस्थापक, मुकुल जैन, प्रधान मुख्य संचालन व्यवस्थापक, राजेश अरोरा, मुख्य मुख्य अभियंता, एन. पी. सिंग, प्रधान मुख्य विद्युत अभियंता, मनिंदर उप्पल, प्रधान मुख्य सुरक्षा अधिकारी आणि इतर प्रमुख विभाग प्रमुख उपस्थित होते. या वेळी मध्य रेल्वेच्या सर्व विभागांचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक या कार्यक्रमाला उपस्थित होते.

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे बुधवारी (दि. ५) आयोजित समारंभात मे-जून २०२३ या कालावधीत त्यांच्या कर्तव्यदक्षतेची दक्षता, अनुचित घटना रोखण्यात आणि रेल्वे संचालनात सुरक्षितता सुनिश्चित करण्यात त्यांचे योगदान याबद्दल त्यांना पुरस्कार प्रदान करण्यात आले.

यामध्ये मुंबई विभागातील सुनील पाटील पॉइंट्समन नेरुळ, भुसावळ विभागातील रमेश सखाराम ट्रॅक मेंटेनर बडनेरा, नागपूर विभागातील गणेश युवाने कीमन धामणगाव, सोलापूर विभाग असिस्टंट लोको पायलट वैभव शर्मा यांना गौरविण्यात आले.



## महाराष्ट्र महान राज्य -राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू

### शासनाकडून राजभवन येथे नागरी सत्कार

**मुंबई : प्रतिनिधी**

समानता व भक्तीचा संदेश देणारे ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ व तुकाराम यांसारखे संत; आत्मसन्मान व राष्ट्र गौरव वाढवणारे छत्रपती शिवाजी महाराज तसेच महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांसारख्या समाजसुधारकांची भूमी असलेले महाराष्ट्र खरोखरच महान राज्य आहे सांगून समाजाच्या शेवटच्या घटकासाठी कार्य करण्याची जाणीव राज्याकडून यापुढेही जपली जावी, अशी अपेक्षा राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी गुरुवारी (दि. ६) येथे व्यक्त केली.



राष्ट्रपतिपदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर महाराष्ट्रातील प्रथम आगमनानिमित्त द्रौपदी मुर्मू यांचा महाराष्ट्र शासनाच्या वतीने राजभवन येथे नागरी सत्कार करण्यात आला. त्या वेळी त्या बोलत होत्या.

कार्यक्रमाला राज्यपाल रमेश बैस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय सामाजिक न्याय व सक्षमीकरण राज्यमंत्री रामदास आठवले, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विधानसभेचे अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, राज्य मंत्रिमंडळातील अनेक मंत्री, माजी मुख्यमंत्री सुशील कुमार शिंदे व पृथ्वीराज चव्हाण, ज्येष्ठ गायिका महाराष्ट्र भूषण आशा भोसले, उद्योजक राजश्री बिर्ला आदी उपस्थित होते.

आपल्या भाषणाची सुरुवात मराठीतून करताना राष्ट्रपती मुर्मू यांनी महाराष्ट्राचे देशाच्या स्वातंत्र्य लढ्यातील, आर्थिक व सामाजिक विकासातील तसेच संगीत व लोककला क्षेत्रातील योगदानाचे कौतुक केले. त्या म्हणाल्या की, राज्यात झालेल्या उत्साहपूर्ण स्वागताने आपण भारावून गेलो आहोत. हा प्रदेश विविधतेने नटलेला आहे. येथे सांस्कृतिक वारसा जतन करून ठेवला आहे. नागपूर, पुणे, मुंबई येथे देशभरातील लोक वास्तव्यास येतात. त्यांचेही या देशाच्या विकासात योगदान आहे. मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी असून देशाच्या आर्थिक विकासात या शहराचे मोठे योगदान आहे. साखर निर्यातीत जगात देशाचा दुसरा क्रमांक आहे. यात महाराष्ट्राचा मोठा वाटा आहे.

राज्याला समृद्ध इतिहास आहे. निसर्गरम्य पर्यटनस्थळे हे राज्याचे वैशिष्ट्य आहे. महान समाजसुधारकांचाही इतिहास या राज्याला आहे. संगीत कला क्षेत्रातही या राज्यातील कलाकारांचे मोठे योगदान आहे. लोककला, लोकनृत्य, चित्रपट यामुळे राज्याची एक वेगळी ओळख निर्माण होते.

समाजातील शेवटच्या घटकापर्यंत विकास पोहचविण्याचे कार्य आपले शासन करीत आहे. यामुळे हे महान राष्ट्र आहे असे सांगून, राज्यातील जनतेच्या उज्ज्वल भविष्यासाठी त्यांनी आशीर्वाद दिले.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचा झारखंड राज्याच्या राज्यपालपदाचा कार्यकाळ संपल्यानंतर त्या राज्याचा राज्यपाल म्हणून काम करण्याचे भाग्य आपणास लाभले असल्याचे राज्यपाल रमेश बैस म्हणाले. त्या राज्यपालांच्या परिषदेत करीत असलेल्या सूचना राष्ट्रपतींसह सर्वांकडून गांभीर्याने घेतल्या जात, अशी आठवण राज्यपालांनी या वेळी सांगितली. देश स्वातंत्र्याचा अमृतकाळ तसेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाचे ३५०वे वर्ष साजरे करीत असताना द्रौपदी मुर्मू यांसारखे साधे व निरलस व्यक्तिमत्व राष्ट्रपती म्हणून लाभणे हे देशाचे भाग्य असल्याचेही राज्यपालांनी सांगितले.

पान १ वरून

### स्थानिक स्वराज्य संघांच्या निवडणुकांची घोषणा नाही!

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी विधानसभा मतदारसंघांच्या अद्ययावत मतदार याद्या वापरण्यासाठीच वेळोवेळी कट ऑफ डेट निश्चित केली जाते आणि त्या संदर्भातील अधिसूचनाही प्रसिद्ध केली जाते. यापूर्वीदेखील या स्वरूपाच्या अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. या अधिसूचना म्हणजे प्रत्यक्ष निवडणूक कार्यक्रम नसतो. अधिसूचनेत नमूद केलेल्या कालावधीत सार्वत्रिक किंवा पोटनिवडणुका न झाल्यास पुन्हा नव्याने कट ऑफ डेट निश्चित करण्यासाठी अधिसूचना प्रसिद्ध केली जाते, असेही मदान यांनी या वेळी सांगितले.

### साथरोग नियंत्रणासाठी आरोग्य विभाग सज्ज

साथरोग निदानासाठी प्रत्येक जिल्ह्यात प्रयोगशाळा सज्ज ठेवण्यात आल्या आहेत. पावसाळ्यातील विविध आजारांवर उपचार करण्यासाठी आवश्यक औषधांचा साठा उपलब्ध करून देण्यात आला आहे. डासोत्पत्ती स्थाने नष्ट करणे, जोखमीच्या भागात कीटकनाशक फवारणी, अळीनाशकांचा वापर, डास उत्पत्ती स्थानांमध्ये गप्पी मासे सोडणे तसेच वैयक्तिक संरक्षणासाठी मच्छरदाण्या, खिडक्यांना जाळ्या बसविणे व डास प्रतिरोधक क्रीम आदी एकात्मिक कीटक व्यवस्थापन कार्यक्रम आरोग्य विभागाच्या माध्यमातून राबविण्यात येत आहे.

## पनवेलमध्ये चिखलमय रस्त्यांवर टाकली खडी

**भाजपच्या पाठपुराव्याला यश**

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महापालिका क्षेत्रातील प्रभाग क्रमांक १७मधील नवनाथ नगर वसाहत, मालधक्का वसाहत, भगत चाळ, रेल्वेस्टेशन रोड येथे पावसामुळे गल्ल्यामध्ये व रस्त्यावर चिखल आणि पाणी झाले होते. याबाबत स्थानिकांच्या तक्रारीनंतर भाजपच्या नगरसेवक व पदाधिकाऱ्यांनी पनवेल महापालिकेकडे पाठपुरावा केला. त्यानंतर बांधकाम अधिकाऱ्यांनी तातडीने रस्त्यावर आणि गल्ल्यांमध्ये खडी टाकण्याचे काम हाती घेतले आहे.

याबाबत माती नगरसेवक ॲड. प्रकाश बिनेदार, ॲड. मनोज भुजबळ, माजी नगरसेविका सुशीला जगदीश घरत, ॲड. वृषाली वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली भाजप अनुसूचित जाती मोर्चा पनवेल तालुका उपाध्यक्ष व बुथ कमिटी ४२८चे अध्यक्ष रावसाहेब खरात, उत्तर रायगड जिल्हा झोपडपट्टी सेल संयोजक राहुल वाहुळकर, सहसंयोजक अशोक आंबेकर, जरीना शेख, नंदा टापरे यांनी सातत्याने पाटपुरावा केल्याने नागरिकांनी त्यांचे आभार मानले आहेत.





**नागपूर : महामाहीम राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू या महाराष्ट्रात तीन दिवसांच्या दौऱ्यावर आल्या होत्या. या वेळी त्यांनी आदिम जमतीकरिता विशेष कार्य करणारे ईश्वर नाईक, भगवान नाईक यांच्यासोबत महाराष्ट्रातील आदिम समाजासाठी राबविण्यात आलेल्या विविध योजना, उपक्रम याबाबत चर्चा केली तसेच कार्यकर्त्यांचे कौतुक केले. या वेळी महाराष्ट्राचे महामहीम राज्यपाल रमेश बैस, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व इतर मान्यवर उपस्थित होते.**



## नेरळजवळ अपघात; पत्नी ठार, पती गंभीर

**कर्जत : प्रतिनिधी**

नेरळ-अंबिवली फाटा येथे कारला शुक्रवारी (दि. ७) सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास अपघात झाला. या अपघातात एक महिला जागीच ठार झाली असून तिचे पती गंभीर जखमी झाले आहेत. अर्पिता प्रमोद कांदलगावकर असे मृत महिलेचे नाव आहे.

नेरळ लव्हाळी वाडी येथे राहणारे कांदलगावकर हे दांपत्य शुक्रवारी आपल्या कारने नेरळ येथून कर्जत भालिवडी शाळेवर निघाले होते. अंबिवली येथील पेट्रोल पंप येथे असलेल्या गोडावून येथील एक टेंम्पो अचानक समोर आल्याने धडक होणार म्हणून प्रमोद यांनी कारचे स्टेरिंग फिरवले असता कार डिव्हायडर चढून अपघात घडला. कारने चार पलटी मारल्याचे प्रथमदर्शनी सांगत आहेत. अपघातानंतर सामाजिक कार्यकर्ते दीपक खडे यांनी धाव घेत जखमींना रायगड हॉस्पिटल येथे दाखल केले. अर्पिता हिचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. तिच्या डोक्यावर जबर मार लागल्याने मृत्यू झाला, तर प्रमोद कांदलगावकर गंभीर जखमी झाले आहेत.

## विठ्ठल रुक्मिणी महिला भजनी मंडळाची भजनरुपी सेवेची तपपूर्ती



**पनवेल : वार्ताहर**

कामोठे येथील विठ्ठल रुक्मिणी महिला भजनी मंडळाने आपल्या भजन रुपी सेवेची तपपूर्ती केली आहे. तब्बल १२ वर्षे १२ जणी भागवत धर्माचा आपल्या सेवेतून प्रचार आणि प्रसार करत आहेत. त्यांच्या या कार्याबद्दल रसाळ दर्शन सेवाभावी ट्रस्टच्या वतीने या वर्षीचा सेवासूर्य पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले आहे.

हरिनामाच्या या जागरामध्ये पुरुषांबरोबरच आता महिलांचाही सहभाग वाढू लागला आहे. कामोठे येथील विठ्ठल रखुमाई भजनी मंडळ २०११पासून भजन सेवा देत आहे. एकूण १२ महिला भगिनी या मंडळात असून हार्मोनियम, टाळ मृदुंगाच्या गजरामध्ये तब्बल एक तप हरिनामाचा जप करीत आहेत. पनवेल परिसरामधील वेगवेगळ्या हरिनाम सप्ताहामध्ये संगीत भजनाच्या माध्यमातून हरी जागर करण्यामध्ये कामोठे येथील हे महिला भजनी मंडळ सातत्याने अग्रेसर राहिलेले आहे. त्याचबरोबर वेगवेगळ्या धार्मिक कार्यक्रमांमध्ये आपली भजन सेवा पांडुरंगाच्या चरणी अर्पण करण्यामध्येही हे महिला भजनी मंडळ मागे राहिले नाही.

आपल्या भजन सेवेमध्ये भक्ती व भावगीतांबरोबरच गवळणीच्या माध्यमातून ईश्वरचरणी लीन होणाऱ्या या महिला भजन सम्राज्ञींनी विविध स्पर्धांमध्ये सहभागी होऊन आपल्या भजन कलेचे सादरीकरण केले. पनवेल पंचक्रोशीमध्ये त्यांनी एक प्रकारे नावलौकिक प्राप्त केला आहे. याच पार्श्वभूमीवर विठ्ठल रुक्मिणी महिला भजनी मंडळाला सेवासूर्य पुरस्कार देऊन गौरवण्यात आले आहे.

# श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक संस्थेचे सामाजिक दातृत्व

## विविध शाळांमध्ये वह्यावाटप; विद्यार्थ्यांमध्ये आनंद









**पनवेल : रामप्रहर वृत्त**

विद्यार्थ्यांना त्यांच्या शिक्षणामध्ये कोणत्याही प्रकाराची समस्या उद्भवू नये, याकरीता गेल्या अनके वर्षांपासून श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने विविध शैक्षणिक उपक्रम सातत्याने राबवण्यात येत आहेत. त्या अंतर्गत पनवेल तालुक्यातील पालेखुर्द, देवीचा पाडा, पडघे आणि पापडीचा पाडा येथे मंडळाच्या वतीने वह्यावाटपाचा कार्यक्रम शुक्रवारी (दि. ७) आयोजित करण्यात आला होता. या वेळी भाजपचे पनवेल तालुकाध्यक्ष तथा मंडळाचे उपाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते वह्यांचे वाटप करण्यात आले.

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ गेल्या तीन दशकांपासून विविध क्षेत्रात विविध कार्य सुरू आहे. त्यानुसार मंडळाच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही गरीब आणि गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटपास सुरुवात झाली आहे. त्या अंतर्गत तालुक्यातील पाले खुर्द, देवीचा पाडा, पडघे, पापडीचा पाडा येथील राजिप शाळांमध्ये वह्यावाटप करण्यात आले.

या वेळी पापडीचा पाडा येथे भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, तालुका सरचिटणीस भुपेंद्र पाटील, पनवेल महापालिकेचे माजी नगरसेवक हरेश केणी, माजी उपसरपंच जगदीश घरत, भाजप नेते कैलास घरत, सुभाष गायकर, विशाल घरत; देवीचापाडा येथे अशोक साळुंखे, रामदास फडके, काळुराम फडके, जोमा पाटील, सुदेश फडके, विजय पाटील, काजल्या पाटील; पाले खुर्द येथे दिनेश खानावकर, युवा नेते महेश पाटील, श्रीनाथ पाटील, पालेखुर्द येथे युवा नेते बाळाराम दाभणे, श्रीनाथ पाटील, जयेश दुर्गे, निशांत साठे; पडघर येथे भाजप ओबीसी सेलचे जिल्हा सरचिटणीस दशरथ म्हात्रे, कृष्णा पाटील, भरत फराड, गजानन पाटील, के. टी. भोईर, पवन भोईर, विद्यानंद पाटील, अमित पाटील, कुणाल पाटील यांच्यासह पदाधिकारी, शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

## फुंडे हायस्कूलच्या विद्यार्थ्यांना वह्यावाटप



**उरण : रामप्रहर वृत्त**

दातृत्वाचे महामेरू म्हणून ख्याती असलेले, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात सढळ हाताने दान करणारे, रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्यामार्गदर्शनाखाली श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने शुक्रवारी (दि. ७) इ. पाचवी ते दहावी अखेरच्या विद्यार्थ्यांना मोफत वह्यावाटप करण्यात आल्या.

विद्यालयाचे चेअरमन कृष्णाजी कडू यांच्या विनंती मागणीनुसार सुमारे तीन हजार वह्या विद्यार्थ्यांसाठी मिळाल्या. त्याबद्दल श्री. रामशेठ विकास मंडळाचे विद्यालयाच्या वतीने आभार मानण्यात आले.

विद्यालयाचे चेअरमन कृष्णाजी कडू, प्राचार्य एम. एम.म्हेत्रे, पर्यवेक्षक एस. जी. म्हात्रे, कार्यालय प्रमुख एम. पी. तुमडे, एच एन पाटील, रमेश खुटारकर, एस. डी. म्हात्रे, दिगंबर पाटील, सुहास नाईक, दर्शना माळी, भोपी आदींच्या हस्ते इ. पाचवी ते दहावीच्या सर्व विद्यार्थ्यांना वह्यावाटप करण्यात आले.

## पाणी मीटरचोरीचा कळंबोली पोलिसांकडून छडा

### दोन अल्पवयीन मुलांसह भंगारविक्रेता ताब्यात

**पनवेल : वार्ताहर**

गेल्या काही दिवसांपासून कळंबोली वसाहतीमध्ये २००पेक्षा अधिक पाणीमीटर चोरीस गेल्याच्या तक्रारी सिडको मंडळाच्या पाणीपुरवठा विभागाकडे आल्या होत्या. या संदर्भात रहिवाशांनी कळंबोली पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. अखेर या चोरीचा छडा लावण्यात पोलिसांना यश आले असून कळंबोली पोलिसांनी याप्रकरणी दोन अल्पवयीन मुलांसह एका भंगार विक्रेत्याला ताब्यात घेतले आहे. त्यांच्याकडून ५४ पाणीमीटर जप्त केले आहेत.

सिडकोच्या पाणीपुरवठा विभागाने कळंबोली आणि नवीन पनवेल येथे लाखो रुपये खर्च करून पाणी मीटर लावून दिले होती. हे मिटर्स चोर मोठ्या शिताफीने पाईपसकट काढून नेत होते. त्यामुळे येथील नागरीक कमालीचे हैराण झाले होते.

यासंदर्भात नागरिकांनी कळंबोली पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आल्यानंतर पोलिसांनी तांत्रिक तपास व गुप्त बातमीदाराच्या सहाय्याने दोन अल्पवयीन मुलांसह भंगार विक्रेता कन्हैया गुप्ता (वय ३५) याला अटक केली आहे. कळंबोली पोलिसांनी त्यांच्याकडून ५४ मीटर्स जप्त केले आहे.

## बँक ऑफ महाराष्ट्रचे बचत गटाला प्रोत्साहन

**पनवेल** : बँक ऑफ महाराष्ट्रच्या पळस्पा शाखेने प्रचिती स्वयंसहाय्यता बचत गटाला दीड लाखांचे अर्थसहाय्य केले होते. प्रचिती स्वयंसहाय्यता बचत गटाने अगदी वेळेत आपल्या कर्जाची परतफेड केली. या वेळी बँक ऑफ महाराष्ट्र पळस्पा शाखेने एका कार्यक्रमाचे आयोजन करून प्रचिती बचत गटाचे कौतुक करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

शाखा प्रबंधक प्रियांका वाळके यांनी बचत गटाला आर्थिक सहाय्य व सामाजिक सुरक्षेच्या विविध योजनांची माहिती दिली. बँक ऑफ महाराष्ट्र शाखा प्रबंधक प्रियांका वाळके, सीआरपी बचत गटाच्या प्रमुख प्रिया ठाकूर, प्रचिती बचत गटाच्या अध्यक्ष दीपाली महाळकर, माधुरी थानगे, अधिकारी अपर्णा श्रीकुमार, तेजस्विनी पाटील, रुपेश पाटील व ग्रामस्थ उपस्थित होते.



**पनवेल : करंजाडेतील भाजप युवा कार्यकर्ते निलेश दराडे यांना वाढदिवसानिमित्त भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर व तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजप जिल्हा संघटन सरचिटणीस अविनाश कोळी, मयुर कदम आदी उपस्थित होते.**




**पनवेल : इंटरनॅशनल टेबल टेनिस चॅम्पियनशिप २०२३ तसेच इंडोशियन क्लब लीग सेशन या दोन्ही स्पर्धेत सीकेटी महाविद्यालयाची विद्यार्थिनी स्वस्तिका घोष हिने महिला एकेरी खुल्या गटात रौप्यपदक पटकावित भारताच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. त्याबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या उपस्थितीत संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे आणि रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलच्या प्राचार्य राज अलोनी यांनी अभिनंदन केले. या वेळी संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, सीकेटी महाविद्यालयाचे क्रीडा संचालक विनोद नाईक आणि स्वस्तिकाचे वडील व प्रशिक्षक संदीप घोष उपस्थित होते.**

## पनवेल मनपातर्फे असंसर्गजन्य रोगनियंत्रण कार्यक्रम प्रशिक्षण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या वतीने असंसर्गजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमाचे (एनसीडी) प्रशिक्षण एनसीडीचे राज्यस्तरीय सल्लागार डॉ. अमर खिराडे यांनी शुक्रवारी (दि. ७) मुख्यालयात सर्व नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र व आरोग्यवर्धिनी केंद्राच्या वैद्यकिय अधिकाऱ्यांना व परिचारिकांना दिले.



या वेळी मुख्य आरोग्य वैद्यकिय अधिकारी डॉ. आनंद गोसावी, शासकीय सामान्य रुग्णालय ठाणे पर्यवेक्षक सुमित गायकवाड, सर्व नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र व आरोग्य वर्धिनी केंद्राचे वैद्यकिय अधिकारी, मुख्यालय वैद्यकिय अधिकारी, एएनएम उपस्थित हाते. बदलत्या जीवनशैलीमुळे असंसर्गजन्य रोग जसे की कॅन्सर, उच्च रक्तदाब, हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी रोग, कर्करोग, श्वासोच्छवासाचे दिर्घ आजार, मधुमेह अशा रोगांमध्ये वाढ होऊ लागली आहे. हे असंसर्गजन्य रोग रोखण्यासाठी आणि नियंत्रणासाठी राष्ट्रीय कार्यक्रम सुरू करण्यात आला आहे. ज्यामध्ये पायाभूत सुविधा मजबूत करणे, मानव संसाधन विकास, आरोग्यास प्रोत्साहन, लवकर निदान, कार्यक्रम व्यवस्थापनासाठी राष्ट्रीय, राज्य व जिल्हा स्तरावरती एनसीडी कक्ष स्थापन करण्यात आले आहेत. या राष्ट्रीय नियंत्रण कार्यक्रमांतर्गत पनवेल महानगरपालिकेच्यावतीने नऊ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र व आरोग्यवर्धिनी केंद्रांच्या वैद्यकिय अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले.

> **आशा व एएनएम असंसर्गजन्यरोग तसेच असंसर्गजन्य रोगांबाबत महापालिका क्षेत्रात घरोघरी भेट देऊन सर्वेक्षण करणार आहे. महापालिका क्षेत्रातील नागरिकांनी सर्वेक्षणासाठी येणाऱ्या कर्मचाऱ्यांना आपल्या आरोग्याबाबत माहिती सांगून सहकार्य करावे. सर्वेक्षणानंतर १८ वर्षांवरील नागरिकांना नजीकच्या नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र तसेच आरोग्यवर्धिनी केंद्रामध्ये आपल्या आरोग्य समस्यांसाठी तसेच असंसर्गजन्य रोगांवरती मोफत औषधोपचार व सल्ला मिळणार आहे.**
>
> **-डॉ. आनंद गोसावी, मुख्य वैद्यकिय आरोग्य अधिकारी**

## सिडकोचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सिडको महामंडळातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचे वार्षिक स्नेहसंमेलन शुक्रवारी (दि. ७) उत्साहात झाले.

या स्नेहसंमेलनास उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक सिडको अनिल डिग्गीकर, सहव्यवस्थापकीय संचालक राजेश पाटील, शंतनु गोयल, डॉ. कैलास शिंदे, मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे, अध्यक्ष सिडको एम्प्लॉईज युनियन विनोद पाटील, सरचिटणीस जे. टी. पाटील, अध्यक्ष, सिडको बीसी एम्प्लॉईज असोसिएशन नरेंद्र हिरे, सरचिटणीस नितिन कांबळे, विभाग प्रमुख, अधिकारी व कर्मचारी त्यांच्या कुटुंबियांसहित मोठ्या संख्यने उपस्थित होते.

सोहळयाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून झाली. या वेळी दक्षिण आफ्रिकेतील मानाच्या समजल्या जाणाऱ्या मॅरेथॉन स्पर्धेमध्ये पीटरमारटीझबर्ग ते डरबन या दोन शहरांदरम्यानचे ८७.७ किमी अंतर केवळ ११.०७ तासांत धावून पूर्ण करीत जागतिक पातळीवर आपला ठसा उमटविणाऱ्या सिडकोचे सहव्यवस्थापकीय संचालक डॉ. कैलास शिंदे यांचा सत्कारही करण्यात आला.

याचबरोबर मुख्य भूमी व भूमापन अधिकारी सतिशकुमार खडके यांची भारतीय प्रशासकीय सेवेमध्ये पदोन्नती झाल्याने त्यांचा सत्कार करण्यात आला. त्यानंतर स्नेहसंमेलनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या वैयक्तिक व सामूहिक क्रीडा स्पर्धांमधील तसेच सांस्कृतिक स्पर्धांमधील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिकही प्रदान करण्यात आले.

सिडको आर्टिस्ट कम्बाइन ग्रुपतर्फे सादर करण्यात आलेल्या गाण्यांनी उपस्थितांची दाद मिळवली तसेच सायंकाळी आयोजित करण्यात आलेल्या संतोष पवार लिखित व दिग्दर्शित 'यदा कदाचित रिटर्न्स' या विनोदी नाटकानेही उपस्थितांची दाद मिळवली.



## सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयात तारांगण



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या उलवे येथील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालय (सीबीएसई) या विद्यालयात शुक्रवारी (दि. ७) विद्यार्थ्यांना कृत्रिम तारांगणाचा अनुभव देण्यात आला.

या कार्यक्रमाचे आयोजन अंजनेय प्लॅनेटेरियम सेंटरचे प्रमुख सुरेश जाधव व अमित जाधव यांनी सीबीएससी बोर्डच्या मुख्याध्यापिका मुक्ता खटावकर व स्टेट बोर्डचे मुख्याध्यापक डी. जी. हजारे यांच्या नियोजनातून केले होते. या तारांगणामार्फत विद्यार्थ्यांना आपली सूर्यमाला, त्यातील प्रत्येक ग्रहांचे स्थान, त्यांचे आकारमान, त्यांचे उपग्रह तेथील भौगोलिक परिस्थिती याची माहिती देण्यात आली. मंगळ ग्रहाच्या पृष्ठभागावरील दृश्य, चंद्र देखावा, धुमकेतू या तारांगणामुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवता आले. सुरेश जाधव व अमित जाधव यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. या वेळी विद्यार्थ्यांसमवेत व्ही. व्ही. गावंड, एस. डी. पाटील, पी. आर. पवार व रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या जे. एस. ठाकूर उपस्थित होत्या. या उपक्रमाबद्दल विद्यालयाचे मुख्याध्यापक डी.जी. हजारे व जे. एस. ठाकूर यांनी सुरेश जाधव व अमित जाधव यांचे आभार मानले.

## उरणमध्ये जखमी भेकराला जीवदान

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

भटक्या श्वानांच्या हल्ल्यात जखमी अवस्थेत वेदनेने तडफडणाऱ्या एका भेकराला फ्रेंड्स ऑफ नेचर (फॉन) संस्थेने तत्परतेने घेतलेल्या काळजीमुळे जीवदान मिळाले आहे.



भटक्या श्वानांच्या हल्ल्यात जखमी झालेल्या एका भेकराने जीव वाचविण्यासाठी आवरे येथील संजय गावंड यांच्या घराचा आसरा घेतला. संजय गावंड यांनी याबाबत तातडीने ग्रामपंचायत सदस्य समाधान म्हात्रे यांना सांगितले. संदेश समाधान म्हात्रे यांनी चिरनेर येथील फ्रेंड्स ऑफ नेचरचे अध्यक्ष जयवंत ठाकूर यांना कळविले. त्यानंतर जयवंत ठाकूर यांनी वनअधिकारी कोकरे यांना या घटनेची माहिती दिली. संस्थेचे सदस्य प्रथमेश ठाकूर, राकेश शिंदे, अविनाश गावंड यांनी घटनास्थळी धाव घेतली आणि जखमी भेकरावर उपचार करायला सुरुवात केली. वनाधिकाऱ्यांच्या कोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली या भेकराला जंगलात सोडून दिले, तरी या भेकराने पळून जाण्याचा प्रयत्न केला नाही.

अखेर वनाधिकारी कोकरे यांनी रेस्क्यू टीमशी संपर्क साधून या जखमी भेकराला पुणे येथे दाखल केले. रेस्क्यू टीमच्या सदस्यांनी या भेकरावर उपचार करण्यास सुरुवात केली आहे. सध्या त्याला एका केजमध्ये सुरक्षित ठेवण्यात आले आहे.

## चिरनेर गावाजवळ ट्रेलरच्या धडकेने पाईपलाईन फुटली; पाणी गेले वाया

**उरण : वार्ताहर**

हेटवणे धरणातून नवी मुंबईला पाणीपुरवठा करणारी जलवाहिनीला एका ट्रेलरने धडक दिल्याने चिरनेर गावाजवळ जलवाहिनी फुटून लाखो लिटर पाणी वाया गेले.



रस्त्यावरून धावणाऱ्या (एमएच ४६ बीएम २१०४) टेलरने धडक दिल्याने ही पाण्याची पाईपलाईन फुटण्याची घटना गुरुवारी (दि. ६) सायंकाळी ६ ते ६.३० वाजण्याच्या सुमारास घडली. फुटलेल्या पाईपलाईनच्या पाण्याचा प्रेशर एवढे आहे की, पाण्याचे फवारे ५० ते ६० फूट उंचीवर उडत असल्याचे दृश्य येथे पाहायला मिळाले.

या पाण्यामुळे चिरनेर येथील शेतकरी महेंद्र ठाकूर यांच्या शेतात गाळ येऊन बसला आहे, तर फार्म हाऊसच्या जागेत फुटलेल्या जलवाहिनीतून वाहून येणाऱ्या पाण्याच्या प्रवाहामुळे खड्डे पडले आहेत. जलवाहिनी दुरुस्त करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

## संपादकीय

# महाविकास आघाडीला धक्के

महाराष्ट्र विधान परिषदेच्या सभापती असलेल्या ठाकरे गटाच्या नेत्या निलम गोऱ्हे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेते प्रवेश केला आहे. राष्ट्रवादीचे नेते अजित पवार व सहकारी राज्य सरकारमध्ये सहभागी झाल्याने शिंदे समर्थक नाराज होऊन ठाकरे गटात परततील अशी अटकळ बांधली जात असताना प्रत्यक्षात मात्र उलटेच घडत आहे. यानिमित्ताने ठाकरे गटासह महाविकास आघाडी आणखी कमकुवत होत असल्याचे चित्र दिसत आहे.

**वर्षभरापूर्वी शिवसेनेचे वरिष्ठ नेते एकनाथ शिंदे आणि सहकारी आमदारांनी उठाव करीत भाजपसोबत सरकार स्थापन केले आणि राज्यात युतीचे राज्य अस्तित्वात आले. खरेतर राज्यातील जनतेने भाजप-शिवसेना युतीलाच कौल दिला होता, पण मुख्यमंत्रिपदाच्या मोहापायी उद्धव ठाकरे यांनी भाजपला एकटे टाकून काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेससोबत एकत्र येत महाविकास आघाडी स्थापन केली आणि या आघाडी सरकारचा मुख्यमंत्री म्हणून उद्धव ठाकरे यांनी शपथ घेतली. त्यांनी अडीच वर्ष कारभार केला. या अडीच वर्षात राज्याची प्रचंड अधोगती झाली. मुख्यमंत्री महाशय घरात बसून राज्यकारभार पाहत असल्याने दुसरे काय होणार? स्वत:ची खुर्ची सांभाळण्यासाठी त्यांनी पक्षाचा बळी दिला. अखेर शिवसेनेची होणारी फरपट सहन न झाल्याने एकनाथ शिंदे यांनी सहकारी आमदारांसह उठाव केला. तेव्हा शिवसेनेसह महाविकास आघाडीला पहिला हादरा बसला. एकीकडे भाजप-शिवसेना युतीचे सरकार मजबुतीने पुढे जात असताना दुसरीकडे महाविकास आघाडीमध्ये अस्वस्थता सुरू झाली. वरकरणी ही मंडळी आम्ही एकत्र असून अभेद्य असल्याचे दाखवित असली तरी वज्रमूठ हळूहळू सैल होत होती. मानापमानाचे प्रयोग रंगत होते. खटके उडत होते. हे सारे जेव्हा सहन करण्याच्या पलीकडे गेले तेव्हा राष्ट्रवादी काँग्रेसचे वरिष्ठ नेते अजित पवार यांनीही राज्यातील सरकारमध्ये सहभागी होण्याचा निर्णय घेतला. त्यांना उपमुख्यमंत्रीपद, तर इतर नऊ जणांना मंत्रीपद देण्यात आले. देशाच्या प्रगती आणि विकासासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशिवाय पर्याय नाही, असे अजितदादांचे ठाम म्हणणे आहे. म्हणूनच विकासाच्या मुद्द्यावर आम्ही सरकारमध्ये दाखल झालो असल्याचे ते सांगतात. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष सत्तेत सहभागी झाल्याने शिवसेनेतील नेते नाराज असल्याच्या चर्चा रंगल्या. काही नेते घरवापसी करतील, असाही आडाखा बांधला जाऊ लागला, पण बुडत्या जहाजात कोण जाईल? उलट ठाकरे गटातील नेते आमच्या संपर्कात असून ते लवकरच शिवसेनेत दाखल होतील, असे मंत्री उदय सामंत यांनी म्हटले होते. त्याची सुरुवात दुसऱ्याच दिवशी निलम गोऱ्हे यांच्या पक्षप्रवेशाने झाल्याचे दिसून येते. अलिकडेच मनीषा कायंदे यांनीही शिंदेचे नेतृत्व स्वीकारले. मध्यंतरी ठाकरे गटात सुषमा अंधारे यांची अचानक एण्ट्री झाली. मागून आलेल्या अंधारेंना महत्त्व दिले जात असल्याने एवढी वर्षे पक्ष संघटनेसाठी कार्यरत असणाऱ्या महिला नाराज झाल्या आहेत. त्यातूनच आधी कायंदे व आता गोऱ्हे यांनी ठाकरे गटाला 'जय महाराष्ट्र' केल्याचे बोलले जात आहे. शिवसेना, राष्ट्रवादी फुटल्यानंतर महाराष्ट्रातील काँग्रेस पक्षातही फूट पडेल, असा दावा शिवसेनेचे प्रवक्ते आमदार संजय शिरसाट यांनी केला आहे. सामंत यांच्याप्रमाणे शिरसाट यांचेही म्हणणे खरे ठरणार का? हे येणारा काळच सांगेल. एवढे मात्र नक्की की महाविकास आघाडीला एकामागोमाग एक धक्के बसत असून ही आघाडी बॅकफूटवर गेली आहे. त्यामुळे आगामी निवडणुकांमध्ये सत्ताधाऱ्यांशी लढण्याआधी त्यांनाच एकमेकांचा आधार घ्यावा लागणार आहे.**

# तांत्रिक बिघाडामुळे 'सेतू'चा सर्व्हर डाऊन!

**खबरबात**
**धम्मशील सावंत**

मागील अनेक दिवसांपासून सेतू सुविधा केंद्रांतील सर्व्हर डाऊन आहे. त्यामुळे विविध कामानिमित्त येणाऱ्यांची सध्या गैरसोय होत आहे. सध्या शाळा-कॉलेजांच्या प्रवेशाची लगबग सुरू असतानाच झालेल्या या तांत्रिक बिघाडामुळे सुधागड तालुक्यासह जिल्हाभर गोंधळाची स्थिती आहे. दरम्यान, महाआयटीचे राज्य व्यवस्थापक राहुल सुर्वे यांनी यावर उपाययोजना करून सेवा पूर्ववत करण्याचा प्रयत्न आहे, असे सांगितले आहे.

सेतू सुविधा केंद्राच्या माध्यमातून एका छताखाली सर्व सुविधा नागरिकांना मिळतात. डोमिसाइल प्रमाणपत्र, जातीचे प्रमाणपत्र, उत्पन्नाचा दाखला आदी सेवा या केंद्रांद्वारे दिल्या जातात. या सेवा केंद्रांमध्ये दररोज मोठ्या संख्येने नागरिक येतात. त्यामुळे रांगा लागतात, मात्र गेल्य कित्येक दिवसांपासून सुधागड तालुक्यासह जिल्हाभरातील सेतू सुविधा केंद्रात सर्व्हर डाऊन असल्याने कर्मचाऱ्यांबरोबरच या केंद्रात विविध कामांसाठी येणाऱ्यांना त्रास होत आहे. सर्व्हर डाऊन असल्याने प्रमाणपत्र किंवा दाखला देण्यात अडचणी येत आहेत. एक प्रमाणपत्र किंवा दाखला घेण्यासाठी बराच वेळ लागत असल्याने लांबच लांब रागा लागत आहेत. परिणामी या केंद्रांवर गोंधळाचे वातावरण आहे. या सर्व प्रकारामुळे नागरिकांची गैरसोय होत असताना सुविधा केंद्रांतील अधिकारी वर्ग याकडे दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप होत आहे. सध्या शाळा-कॉलेजांची प्रवेशप्रक्रिया सुरू आहेत. कॉलेजच्या प्रवेशासाठी अधिवास प्रमाणपत्र लागते. सेतू केंद्रातील तांत्रिक समस्येमुळे विद्यार्थ्यांच्या पालकांना हे प्रमाणपत्र मिळवताना मनस्ताप होत आहे.


उत्पन्नाचा दाखला मिळवण्यासाठी अनेक जण सेतू केंद्रांवर रोज हेलपाटे मारत आहेत, पण सर्व्हर डाऊन असल्याचे कारण देत आम्हाला परत पाठवले जात आहे. यांच्या निष्काळजीमुळे आमच्या मुलांचे प्रवेश धोक्यात आले आहेत. याची जबाबदारी अधिकारी घेणार आहे का? सगळ्या सेतू केंद्रांवर प्रचंड गर्दी होत आहेत, पण याची दखल कोणीच घेत नाही हे संतापजनक आहे, असे सेतू केंद्रावरील गोंधळाचा फटका बसलेल्या योगेश गिरी यांनी सांगितले.

विद्यार्थ्यांना अकरावी प्रवेशासाठी नॉन क्रिमिलेअरचे प्रमाणपत्र सादर करण्यास शिक्षण विभागाने मुदतवाढ दिली आहे, परंतु प्रवेशावेळी ते सादर न करू शकणाऱ्यांना प्रमाणपत्र काढण्यासाठी केलेल्या अर्जाची पोहचपावती देण्यास सांगण्यात आले आहे. गेल्या काही दिवसांपासून सेतू केंद्रांवर सर्व्हर डाऊन असल्याने हे प्रमाणपत्र काढण्यासाठी विद्यार्थी अर्जच करू शकलेले नाहीत. त्यामुळे पोहोचपावती कशी सादर करायची, असा पालकांचा सवाल आहे.

दरम्यान, या संपूर्ण प्रकारावर महाआयटीचे राज्य व्यवस्थापक राहुल सुर्वे यांनी सांगितले की, महा-ई-सेवा तसेच सेतू केंद्रांसाठी महाआयटी अंतर्गत एकच क्लाऊड सर्व्हर आहे. या क्लाऊड सर्व्हरमध्ये मोठ्या प्रमाणात डाटा संचयित झाला आहे. परिणामी क्लाऊडमध्ये जागा (स्पेस) उपलब्ध नसल्याने जुना संचयित डाटा काढण्यात आला आहे तसेच किरकोळ तांत्रिक बिघाड दुरुस्त करून सेवा पूर्ववत करण्याचा प्रयत्न आहे.

# प्रसिद्ध कवी बा. भ. बोरकर

बाळकृष्ण भगवंत बोरकर हे मराठीतील प्रसिद्ध कवी, कादंबरीकार आणि लघुनिबंधकार होते. बोरकर यांचा जन्म ३० नोव्हेंबर १९१० रोजी कुडचडे (गोवा) येथे झाला. त्यांचे शिक्षण धारवाड येथे मराठी तीन इयत्ता व इंग्रजी मॅट्रिकपर्यंत झाले. पोर्तुगीज टीचर्स ट्रेनिंग कॉलेजची प्रमाणपत्र परीक्षाही ते उत्तीर्ण झाले. गोव्यातील खासगी व सरकारी हायस्कूलांमध्ये ते शिक्षक होते. काही काळ मुंबईच्या विविध वृत्तपत्रात त्यांनी नोकरी केली. १९४६मध्ये गोव्याच्या स्वातंत्र्य-आंदोलनात त्यांनी भाग घेतला. आमचा गोमंतक (१९४८) व पोर्जे चो आवाज (कोकणी, १९५५) या पत्रांचे ते संपादक होते. आकाशवाणीच्या पुणे-पणजी केंद्रांवर, वाङ्मय विभागात, १९५५ ते १९७०पर्यंत काम करून ते निवृत्त झाले.



प्रतिभा हा बोरकरांचा पहिला काव्यसंग्रह मडगाव येथील महाराष्ट्र साहित्य संमेलनात प्रसिद्ध झाला (१९३०). त्यानंतर जीवन संगीत (१९३७), दूधसागर (१९४७), आनंद भैरवी (१९५०), चित्रवीणा (१९६०), गीतार (१९६६), चैत्रपुनव (१९७०) आणि कांचनसंध्या (१९८१) हे त्यांचे काव्यसंग्रह प्रकाशित झाले. सासाय हा त्यांचा कोकणी काव्यसंग्रह १९८१मध्ये प्रसिद्ध झाला. त्याला त्या वर्षीचा साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त झाला. १९८१मध्येच कालिदासकृत मेघदूताचा त्यांनी केलेला समवृत्त, समश्लोकी मराठी अनुवाद प्रसिद्ध झाला. बोरकरांचे व्यक्तिमत्त्व व कवित्व संस्कारबहुल आहे. तसे ते परंपराप्रेमी, पण त्यांच्या परंपराप्रेमावर झालेल्या सुभग व रसपूर्ण संस्कारांनी त्यांना 'कवी' बनविले. ग्रीकांच्या सौंदर्यदृष्टीचे मर्म पाश्चात्य साहित्याच्या अध्ययनाने आणि पौर्वात्य आत्मदर्शनाचे स्वरूप मराठी संतांच्या अभ्यासातून त्यांनी आत्मसात केले. बालकवी आणि विशेषतः तांबे यांच्या कवितेचा आदर्श त्यांच्यापुढे होता. निसर्गसौंदर्य व स्त्रीलावण्य यांच्यामधून बोरकरांना जीवनचैतन्याचा साक्षात्कार झाला. निसर्ग व प्रणय यांची त्यांच्या कवितेतील अनुभूती सर्जनशील व ऐंद्रिय होती.

बोरकरांच्या कथा प्रियदर्शिनी (१९६०) आणि समुद्रकाठची रात्र (१९८१) या संग्रहांत समाविष्ट झालेल्या आहेत. मावळता चंद्र (१९३८), अंधारातील वाट (१९४३) व भावीण (१९५०) या त्यांच्या तीन कादंबऱ्या होत. यापैकी भावीण विशेष गाजली. तिची पाच भाषांत भाषांतरेही झाली आहेत. कागदी होड्या (१९३८) या त्यांच्या लघुनिबंधसंग्रहात काव्य व चिंतन यांचा मधुर मिलाफ आढळतो. चांदण्यांचे कवडसे हा त्यांचा ललितनिबंधसंग्रह १९८१ मध्ये प्रसिद्ध झाला. आनंदयात्री रवींद्रनाथ (१९६३) हे टागोरांचे चरित्रही त्यांनी मोठ्या समरसतेने लिहिले.

बोरकरांना कवितेबद्दल महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे सुवर्णपदक (१९३४), भावीण कादंबरीबद्दल गोमंतक मराठी साहित्य संमेलनाचे सुवर्णपदक (१९५०), आनंद भैरवी, चित्रवीणा, गीतार, आनंदयात्री रवींद्रनाथ या पुस्तकांना महाराष्ट्र शासनाची पारितोषिके, असे सन्मान लाभले. राष्ट्रपतींनी 'पद्मश्री' हा किताब देऊन त्यांचा सन्मान केला (१९६७). स्वातंत्र्यसंग्रामात बोरकर ह्यांनी केलेल्या कार्याबद्दल भारत सरकारतर्फे त्यांना ताम्रपट देण्यात आला (१९७४). अशा या प्रसिद्ध कवीचे ८ जुलै १९८४ रोजी निधन झाले. **(साभार : इंटरनेट)**

## बदलते तंत्रज्ञान

# मेटा थ्रेड्स नक्की आहे तरी काय? कसं वापराल?




मेटा कंपनीचे लोकप्रिय फोटो-व्हिडिओ शेअरिंग ॲप इन्स्टाग्राम यांनी ट्विटरला टक्कर देण्यासाठी म्हणून थ्रेड्स हे ॲप लॉंच केले आहे. ट्विटरमधील या सततच्या बदलांमुळे वापरकर्त्यांना प्लॅटफॉर्म वापरणे कठीण होत आहे. वापरकर्ते ट्विटरला एक चांगला पर्याय शोधत असताना, इन्स्टाग्रामच्या नवीन थ्रेड ॲपला त्याचा थेट फायदा होताना दिसत आहे.

**थ्रेड्सवर काय सुविधा मिळणार?**

युरोपीय संघराज्यातील देशांमध्ये अद्याप थ्रेड्स ॲप लॉंच केलेले नाहीत, मात्र याचे फिचर्स ट्विटरसारखेच आहेत. वापरकर्ते थ्रेडवर ५०० वर्णांपर्यंतचे संदेश पोस्ट करू शकतात. थ्रेड्स हा इंस्टाग्रामचाच विस्तारीत प्लॅटफॉर्म आहे. यावर युजर्स टेक्स्ट संदेशांव्यतिरिक्त लिंक्स, फोटो आणि ५ मिनिटांपर्यंतचे व्हिडिओ पोस्ट करू शकणार आहेत. पहिल्या चार तासांत या ॲपमध्ये ५ दशलक्ष युजर्स जोडले गेले. हे ॲप 'युजर-फ्रेंडली' ठेवल्याने याला जास्त यश मिळेल, असे झुकरबर्ग म्हणाले.

थ्रेड्स कसं वापराल?

तुम्ही थ्रेड्सवरून इन्स्टाग्रामवर आणि इन्स्टाग्रामवरून थ्रेड्सवर पोस्ट शेअर करू शकता. पहिल्या दिवशी काही युजर्सनी त्यावर फोटो पोस्ट करताना काही अडचणी येत असल्याचे सांगितले. पण युजरच्या वापरकर्त्यांच्या पोस्टचे फीड, ते ज्यांना फॉलो करतात त्यांचा मजकूर किंवा रेकमेंडेड मजकूर याच्यानुसार येतात, त्यालाच मेटा थ्रेड म्हणतात.

**काय सुविधा मिळणार?**

आपल्याला कोणी टॅग करावे, याचे नियंत्रण युजर्सच्या हाती असणार आहे. विशिष्ट शब्द असलेल्या पोस्टची उत्तरे फिल्टर करू शकता येणार आहेत. एखाद्याला अनफॉलो करणं, ब्लॉक करणं, प्रतिबंधित करणं किंवा तक्रार करणं या सुविधा थ्रेड्समध्ये देण्यात आल्या आहेत. इन्स्टाग्रामवर ब्लॉक केलेला युजर आपोआप थ्रेड्सवरदेखील ब्लॉग होईल.

# भारतीय क्रिकेटचा 'दादा' सौरव गांगुली



**निमित्त**

भारतीय क्रिकेटपटूंना नीडरपणे ज्याने खेळायला शिकवले त्याचे नाव म्हणजे सौरव चंडीदास गांगुली. पूर्वीच्या काळात काही परदेशी देशांचे खेळाडू स्लेजिंग करून टीम इंडियाच्या खेळाडूंचे चित्त विचलित करीत असत, त्यांच्यावर दादागिरी करीत असत. त्यांच्या आरेला कारे असे उत्तर देण्यास सौरव गांगुलीने सुरुवात केली आणि जशास तसे वागण्यास संघ सहकाऱ्यांना शिकविले. मग सौरवचा दरारा इतका तयार झाला की आदर व प्रेमाने त्यालाच सर्वजण 'दादा' म्हणून लागले. गांगुली हा भारतीय संघाचे एक यशस्वी कर्णधारदेखील होता.

सौरव गांगुली सध्या भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचा (बीसीसीआय) आणि विस्डेन इंडिया सहसंपादकीय मंडळाचा अध्यक्ष आहे. बीसीसीआयचा अध्यक्ष म्हणून निवड होण्यापूर्वी तो पश्चिम बंगाल, भारतमधील क्रिकेटसाठी प्रशासकीय संस्था, बंगाल क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष होता. क्रिकेट जगातील एक महान कर्णधार म्हणून त्याच्या नावाने ओळखले जाते. त्याने आपल्या खेळण्याच्या कारकीर्दीत स्वतःला जगातील आघाडीचा फलंदाज आणि भारतीय राष्ट्रीय क्रिकेट संघाचा यशस्वी कर्णधार म्हणून स्थापित केले. त्याचा मोठा भाऊ स्नेहासिषने गांगुलीने त्याला क्रिकेटविश्वात पुढे जाण्यास खूप मदत केली होती.

राज्य आणि शालेय संघात खेळून सौरवने आपल्या कारकीर्दीची सुरुवात केली. मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरनंतर तो वन डे आंतरराष्ट्रीयमध्ये १०००हून अधिक धावा करणारा भारतीय संघाचा दुसरा खेळाडू ठरला.

सौरवचा जन्म ८ जुलै १९७२ रोजी कोलकाता येथे झाला होता. त्याच्या वडिलांचे नाव चंडीदास आणि आईचे नाव निरुपा. सौरव त्यांचा धाकटा मुलगा. श्रीमंत कुटुंबात जन्म घेतलेल्या सौरवचे विलक्षण असे बालपण होते आणि त्याला 'महाराजा' असे नाव पडले. कोलकततामधील लोकांचा आवडता खेळ फुटबॉल होता. त्यामुळे सौरव सुरुवातीला त्या खेळाकडे आकर्षित झाला होता, परंतु शैक्षणिक अभ्यास त्याच्या खेळाच्यामध्ये आला आणि आईने त्याला क्रिकेट किंवा इतर कोणताही खेळ करिअर म्हणून खेळण्यास फारसा पाठिंबा दिला नाही, पण मोठा भाऊ स्नेहासिश बंगाल क्रिकेट संघाचा एक क्रिकेटपटू होता. त्याने सौरवच्या स्वप्नाचे समथर्न केले आणि त्यांच्या वडिलांना उन्हाळ्याच्या सुटीत क्रिकेट कोचिंग शिबिरात दाखल करण्यास सांगितले.

सौरवने आपल्या करिअरची सुरुवात शाळा आणि राज्यस्तरीय टीममध्ये खेळत असताना केली. रणजी ट्रॉफी, दलीप ट्रॉफी अशा अनेक प्रादेशिक स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी केल्यामुळे त्याला इंग्लंडविरुद्ध राष्ट्रीय संघात खेळण्याची संधी मिळाली. पहिल्या कसोटीत त्यांनी १३१ धावा करून संघात आपले वर्चस्व निर्माण केले. यानंतर त्याने मागे वळून पाहिले नाही.

**(साभार : इंटरनेट)**

## आरोग्य प्रहर

# पावसात केस भिजल्यावर 'असे' राहा बॅक्टेरियापासून दूर!




जवळपास सर्वच राज्यांमध्ये मान्सूनने जोरदार हजेरी लावली आहे. हे हवामान खूप आनंददायी असू शकते, परंतु सावधगिरी बाळगणे कधीही विसरू नये, कारण या ऋतूत आजारांचा सर्वाधिक धोका असतो. या ऋतूतील आर्द्रतेमुळे बॅक्टेरिया वाढण्याचा धोका वाढतो. त्यामुळे अनेक प्रकारच्या समस्या निर्माण होत आहेत. यापैकी एक म्हणजे केसांची समस्या. खरंतर घराबाहेर पडताना अनेक वेळा ओले होतात. त्यामुळे केस चिकट आणि कोरडे होतात. यामुळे फंगल-बॅक्टेरियाचा धोकाही वाढतो. जर तुम्हालाही अशा प्रकारचा त्रास होत असेल, तर काही सोप्या टिप्स पाळल्या पाहिजेत, ज्यामुळे तुम्ही पावसाळ्यात तुमचे केस निरोगी ठेवू शकता. कसे ते जाणून घेऊया...

पावसाळ्यात कमी वेळा धुवावेत जेणेकरून केसांमध्ये ओलावा कमी राहील. पावसाळ्यात वारंवार केस धुण्यामुळे टाळूमध्ये आर्द्रता निर्माण होते, ज्यामुळे केस निर्जीव आणि अधिक कोरडे दिसतात. अशा परिस्थितीत केस गळण्याची समस्या सामान्य होते. याशिवाय केस वारंवार ओले केल्याने सर्दी, डोकेदुखी इ. यासोबतच फंगल-बॅक्टेरियाचा धोकाही वाढू शकतो.

मान्सून उंबरठ्यावर येताच सावध व्हायला हवे. केसांपासून त्वचेपर्यंतच्या अनेक समस्या या ऋतूत वाढतात. बदलत्या ऋतूनुसार केसांना पूर्ण पोषण दिले पाहिजे. असे न केल्याने केस निर्जीव होऊन गळू लागतात. यासाठी केसांना नियमित तेल लावणे आवश्यक आहे. याशिवाय दर १५ दिवसांनी केसांना डीप कंडिशनिंग करा. असे केल्याने केसांना पूर्ण पोषण मिळेल.

पावसाळा केसांसाठी अनेक समस्या घेऊन येतो. यासाठी केसांची योग्य काळजी घेणे आवश्यक आहे. पावसाळ्यात टाळूवर जास्त आर्द्रता असते, ज्यामुळे केसांची पीएच पातळी खराब होऊ शकते. याशिवाय केस चिकट होऊ लागतात. ही समस्या टाळण्यासाठी सर्वप्रथम पाण्यात थोडेसे ॲपल सायडर व्हिनेगर मिसळा. यानंतर केस धुवा. असे केल्याने केसांमध्ये जमा झालेले अतिरिक्त तेल दूर होते, पण कोणत्याही परिस्थितीत तज्ज्ञांचा सल्ला आवश्यक आहे.

**क्लिक...क्लिक...!**



**मुंबई : राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी गुरुवारी राज्यपाल रमेश बैस यांच्यासह राजभवनातील भूमिगत बंकरमध्ये तयार केलेल्या 'क्रांती गाथा' या स्वातंत्र्यलढ्यातील क्रांतिकारकांच्या दालनाला भेट दिली.**

# रायगडात भटक्या श्वानांची दहशत कायम

## वर्षभरात सहा हजार ४२७ अधिक लोकांवर हल्ले

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात भटक्या श्वानांचा उपद्रव दिवसेंदिवस वाढत आहे. जिल्ह्यात भटक्या श्वानांनी वर्षभरात सहा हजार ४२७ अधिक लोकांवर हल्ले केले आहेत. दररोज सरासरी ८२ जणांना श्वानदंश होत आहे. ग्रामीण भागाच्या तुलनेत शहरी भागात श्वानदंशाचे प्रमाण अधिक आहे.



रायगड जिल्ह्यात गेल्या वर्षभरात श्वानदंशाच्या सहा हजारहून अधिक घटना समोर आल्या आहेत, तर २०२१पासून ३९ हजारहून अधिक लोकांना श्वानदंश झाल्याचे शासकीय आकडेवारी सांगते. ही आकडेवारी शहरी भागात शासकीय रुग्णालयात उपचार घेतलेल्या रुग्णांची आहे. यात खासगी रुग्णालयात उपचार घेतलेल्या रुग्णांचा समावेश नाही. त्यामुळे ही संख्या अजूनही जास्त असण्याची शक्यता नाकारता येणार नाही. विशेष म्हणजे ग्रामीण भागाच्या तुलनेत शहरीभागात श्वानदंशाचे प्रमाण अधिक आहे. पनवेल, उरण, कर्जत, अलिबाग, पेण, महाड या शहरात श्वानदंशाच्या घटना घडल्या आहेत.

शहरी भागात भटके श्वान झुंड करून राहतात. रात्रीच्या वेळी हे शहरातील रस्त्यावर झुंडीनेच फिरतात. काळोखात येणाऱ्या जाणाऱ्यावर भुंकतात. वाहन चालकांच्या मागे लागतात. आणि आक्रमक होऊन बरेचदा लहान मुले, वृद्धांवर हल्लेदेखील करतात. श्वानांमुळे होणाऱ्या अपघातांचे प्रमाणही वाढत आहे. यात अनेक दुचाकीस्वार गंभिररीत्या जखमी झाले आहेत. गेल्या काही वर्षात जिल्ह्यातील शहरी भागात श्वानांचे निर्बिजीकरण मोहिमा राबविण्यात आल्या, मात्र या मोहिमांना फारसे यश मिळतले नाही. दरवर्षी लाखो रुपये खर्चूनही शहरी भागात भटक्या श्वानांचे प्रमाण कमी झालेल नाही. निर्बिजीकरणानंतर आठ दिवस श्वानांची काळजी घेणे गरजेचे असते. या श्वानांना ठेवायचे कुठे? हा प्रश्न प्रशासनासमोर असतो.

| वर्ष | श्वानदंश |
|---|---|
| २०२० | ८,७५७ |
| २०२१ | ९,१३८ |
| २०२२ | १०,६२५ |
| २०२३ | ६,४२७ |

**जिल्ह्यातील सर्व शासकीय रुग्णालयात श्वानदंशावर मोफत उपचार केले जातात. त्यासाठी आवश्य औषधसाठा आणि लस साठा उपलब्ध करून देण्यात आला आहे.**
**–डॉ. सुधाकर मोरे, जिल्हा आरोग्य अधिकारी, रायगड**

# पेणमध्ये भाजपच्या संपर्क अभियानाला वाढता प्रतिसाद



**पेण : रामप्रहर वृत्तसंस्था**

मोदी सरकारला नऊ वर्षे पूर्ण झाल्याने भाजपतर्फे मोदी सरकारने जनतेसाठी राबविलेल्या विविध योजनांची माहिती सामान्य जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी मोदी @ ९ या कार्यक्रमांतर्गत महाजनसंपर्क अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानाला पेणमध्ये उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे.

तालुक्यातील रावे, दादर, जोहे, भाल, विठ्ठल वाडी येथील महिलांचा या अभियानात मोठा सहभाग लाभत आहे. आमदार रविशेठ पाटील, माजी आमदार धैर्यशील पाटील, पेण विधानसभा संयोजक वैकुंठ पाटील यांच्या नेतृत्वाखाली अभियान यशस्वी होत आहे.

मोदी सरकारचे कार्य घरोघरी पोहचविण्यासाठी भाजप कार्यकर्ते पावसाची तमा न बाळगता कार्य करीत आहे. अभियानात प्रामुख्याने भाजप नेत्या शर्मिला वैकुंठ पाटील, माजी जि. प. सदस्य कौसल्या पाटील, वंदना म्हात्रे, स्नेहल सावंत, विजया पाटील, हमरापुर विभागातील महिला सहभागी झाल्या आहेत.

# बहिराम कोटक येथील तडा गेलेल्या जागेची भाजप पदाधिकाऱ्यांकडून पाहणी

**पेण : प्रतिनिधी**

खारेपाटातील बहिराम कोटक येथील बहिरीदेव मंदिराजवळील माती घसरून खांड गेली असून या खांडीची पाहणी भाजप जिल्हा सरचिटणीस मिलिंद पाटील यांनी केली. या वेळी त्यांनी खारलँड अधिकारी दादासाहेब सोनटक्के यांच्याशी चर्चा केली तसेच युद्धपातळीवर हे काम लवकरात पूर्ण करावे अशी मागणी केली.

नारवेल–बेनवले खारबंदिस्तीचे काम हे निकृष्ट झाल्याचे दिसून आले असून वारंवार फुटणाऱ्या खारबंदिस्तीसाठी मोठमोठे दगड टाकून बंधारा मजबूत करण्याचे प्रयत्न करण्याचीगरज आहे असे मिलिंद पाटील यांनी या वेळी सांगितले.



(छाया : इजाज मनियार)

त्यांच्यासोबत भाजप पेण तालुका सरचिटणीस सचिन पाटील, पोलीस पाटील निशीत पाटील, के. डी. म्हात्रे, कळवे माजी सरपंच कमळाकर मोकल, पैरानकरवाडीचे सदानंद म्हात्रे, उपसरपंच भगवान मोकल, प्रेमलता थवई, दिव ग्रामपंचायतीचे माजी सदस्य प्रकाश पाटील, रामकृष्ण पाटील, प्रदीप थवई, किरण माळी, प्रकाश माळी, नशीब माळी आणि ग्रामस्थ बहुसंख्येने उपस्थित होते.

# माणगावातील धाडसी रेस्क्यू टीमचे प्रांतांकडून कौतुक

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव काळनदी पात्रात १ जुलै रोजी पाण्याच्या प्रवाहात मृतदेह वाहत जात असल्याचे काही नागरिकांच्या निदर्शनास आल्यानंतर माणगाव पोलिसांनी नदीकिनारी शोध घेण्याचे काम सुरू केले होते. त्यानंतर त्यांनी तत्काळ माणगाव येथील साळुंके रेस्क्यू टीमला बोलावण्यात आले. त्यांनी ही कामगिरी यशस्वीरित्या पूर्ण केल्याने माणगाव उपविभागीय अधिकाऱ्याचा पदभार घेतलेले उपविभागीय अधिकारी डॉ. संदीपान सानप यांनी तहसील कार्यालयात रेस्क्यू टीमच्या धाडसी सदस्यांचा सत्कार करीत पाठ थोपटली.



लोणशी येथील काळ नदीत मगरीचा संचार असणाऱ्या डेंजर झोन म्हणून परिचित असणाऱ्या भागात हा मृतदेह तरंगत असल्याचे दिसले. मृतदेहाजवळच दोन मगरी रेस्क्यू टीमला दिसल्या. त्यामुळे मृतदेह बाहेर काढण्याचे आव्हान या टीमपुढे उभारले होते. या टीमने धाडस करून मगरी जवळून चाणाक्षपणाने मृतदेह काढण्यात यश आले होते. याबद्दल उपविभागीय अधिकारी डॉ. संदीपान सानप यांनी या रेस्क्यू टीमचे अभिनंदन केले. त्या वेळी माणगाव तहसीलदार विकास गारुडकर, मंडळ निरीक्षक अर्जुन जमखंडी आदी उपस्थित होते.

## निवडक



### रोह्याच्या महदेववाडी शाळेत वृक्षारोपण

**धाटाव :** महाराष्ट्र शासनाच्या वृक्षारोपण उपक्रमांतर्गत रोह्यातील राजिप शाळा महादेववाडी येथे शाळेच्या परिसरात गुरुवारी (दि. ६) रोप लागवड करण्यात आली. या वेळी शाळा कमिटीचे उपाध्यक्षा संगीता भगत, आश्विनी सुतार, जितेंद्र जावध, तेजेस्वीनी सुतार, मुख्खध्यापक रामचंद्र भोईर, धाटाव केंद्र प्रमुख नारायण गायकर, ललित लेंढी, संतोष तपकिरी, आश्विनी नाईक यांसह विद्यार्थी उपस्थित होते.

### विद्यार्थ्यांना विविध वस्तूंचे वाटप



**पेण :** पेण एज्युकेशन सोसायटीच्या प्राथमिक शाळेत गुरुपौर्णिमेचे औचित्य साधून सावित्रीबाई दत्तक पालक योजना एमटीएस धारक गुणवंत विद्यार्थी गौरव व सोबती संस्थातर्फे शाळेतील विद्यार्थ्यांना मोफत वस्तूंचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सोबती संस्थेचे अध्यक्ष ॲड. बापूसाहेब नेने उपस्थित होते, तसेच संस्थेचे माजी कार्याध्यक्ष वसंतराव आठवले, उपकार्याध्यक्ष संजय कडू, स्वीकृत सदस्या डॉ. नीता कदम, निलेश म्हात्रे, माजी मुख्याध्यापिका कलावती पाटील, मुख्याध्यापिका लेखा ठाकूर, मुख्याध्यापिका रोहिणी म्हात्रे आदीसह शिक्षक वर्ग उपस्थित होते.

### बुद्ध पौर्णिमेनिमित्त धार्मिक कार्यक्रम

**पाली :** श्रमण बुद्धविहार क्रांतीनगर पेण येथे बुद्ध पौर्णिमेनिमित्त वंचित बहुजन आघाडी व पंचशील महिला मंडळ यांच्या माध्यमातून विविध धार्मिक कार्यक्रम घेण्यात आले. या कार्यक्रमास भारतीय बौद्ध महासभेचे अध्यक्ष चंद्रकांत सोनावणे व त्यांची कार्यकारिणी, प्रमुख पाहुणे म्हणून संतोष जाधव उपस्थित होते. बौद्ध धम्माचा प्रसार व प्रचार कामी अग्रेसर राहणारे बौद्ध महासभेचे अध्यक्ष चंद्रकांत सोनावणे यांचे स्वागत व सत्कार करण्यात आला. या वेळी वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष संजय गायकवाड, महासचिव प्रदिप गायकवाड, उपाध्यक्ष सुनिल शिंदे, शशिकला गायकवाड, शैला गायकवाड, छाया मोरे, सुलोचना दामले, कांताबाई शिंदे, यमुना गायकवाड, लता शिंदे, संगिता ओव्हाळ उपस्थित होते. बुद्धपौर्णिमा ते अश्विन पौर्णिमापर्यंत वर्षावास मालिका याचे महत्त्व संतोष जाधव, चंद्रकांत सोनावणे यांनी प्रवचनातून मांडले.

# रायगडवाडी छत्री निजामपूर रस्त्याच्या दुरुस्तीची मागणी

**महाड : प्रतिनिधी**

किल्ले रायगडाच्या पायथ्याशी वसलेल्या छत्री निजामपूर गावामध्ये जाण्यासाठी असलेल्या रस्त्याला खड्डे पडले आहेत. या खड्ड्यांमध्ये पावसाचे पाणी साचत असल्याने नागरिकांना एसटी बस फेरी बंद पडण्याची भीती वाटत आहे.

छत्री निजामपूर या गावाला जाण्यासाठी रायगड वाडी येथून डांबरी रस्ता आहे. या रस्त्याची दुरुस्ती किल्ले रायगड प्राधिकरणाच्या माध्यमातून करण्यात आली होती. रायगडवाडी ते छत्रीनिजामपूर हे अंतर चार किमीचे आहे. या रस्त्याची दुरुस्ती रायगड प्राधिकरणच्या माध्यमातून होत आहे. पावसाळ्यात या रस्त्यावर खड्डे पडले आहेत.



यामुळे डोंगर उतारावरून येणारे पावसाचे पाणी या खड्ड्यात साचून राहत आहे.

यामुळे या परिसरातील छत्री निजामपूर, वाघेरी, बावळे, कावळे, आदी गावातील नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. गेली काही वर्षांपासून खराब रस्त्यामुळे वारंवार एसटी बस सुविधा ऐन पावसाळ्यात बंद ठेवाण्यात येते. यावर्षीदेखील अशीच स्थिती असल्याने नागरिकांना बस पुन्हा बंद होण्याची भीती नागरिकांना आहे.

# खालापुरातील मुदत संपलेल्या २२ ग्रामपंचायतींमध्ये प्रशासकाची नेमणूक

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील २२ ग्रामपंचायतींची मुदत संपल्याने प्रशासकांची नेमणूक राजिप मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केली आहे.

तालुक्यातील तांबाटी, नंदनपाडा, शिरवली, चिलठण, नारंगी, मानकिवली, ठाणेन्हावे, माजगाव, इसांबे व खानाव या ११ ग्रामपंचायतींची मुदत २८ जून रोजी संपली, तर २ जुलै रोजी वासांबे, चांभार्ली, होनाड, आत्करगाव, वावरले, वरोसे, बोरगाव, जांबरुंग, बीड, सावरोली, कुंभिवली अशा ११ ग्रामपंचायतीची मुदत संपल्याने प्रशासकांची नेमणूक करण्यात आली आहे.

२२पैकी वासांबे येथील १७ सदस्य यांचे अनियमितपणामुळे सदस्यपद रिक्त केले असून थेट सरपंच यांची मुक्तता करण्यात आली आहे. ज्यांची प्रशासक म्हणून नेमणूक झाली आहे, त्यांनी आपला मूळ पदभार सांभाळून काम करावयाचे आहे, असे निर्देश देण्यात आले आहेत.

# ॲड. राजीव साबळे यांचा वाढदिवस सामाजिक कार्यक्रमांनी साजरा

**माणगाव : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषदेचे माजी शिक्षण व आरोग्य समिती सभापती व माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. राजीव अशोक साबळे यांचा वाढदिवस माणगाव येथे शुक्रवारी (दि. ७) विविध सामाजिक कार्यक्रमांनी साजरा करण्यात आला.

या दिवशी सकाळी लोकनेते तथा माजी आमदार स्व. आशोक साबळे यांना साबळे कुटुंबीय व मित्रपरिवारातर्फे आदरांजली वाहण्यात आली.

माणगावात रक्तदान शिबिर, वृक्षारोपण, विद्यार्थ्यांना गणवेश व छत्री वाटप असे विविध सामाजिक व शैक्षणिक कार्यक्रमांनी ॲड. राजीव साबळे यांचा वाढदिवस उत्साहात साजरा करण्यात आला. माणगाव येथील द. ग. तटकरे महाविद्यालयात वाढदिवस अभिष्टचिंतन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी त्यांच्या अनेकांनी भेट घेऊन त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.


MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM RE-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical Contractors on MAHATRANSCO website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender Specification.

| Sr. No. | Tender / Notice No. | Particulars of Tender | Estimated Cost of Tender |
|---|---|---|---|
| 1 | **Tender No.:** EE/EHV (O&M)/DIVN/MHD/ Tech/E-Tender No.-28/2023-24 Dt. 10.07.2023 **RFx No. 7000027890** | **Sub.:** Invitation SRM E-Tender for the Work of Equipment Support Structure Anticorrosive Coating/Painting at 220 kV Kandalgaon S/s. under EHV (O&M) Dn., Mahad. | Rs. 24,82,573/- (Including Taxes) |

**EMD** will be the 1% of the Estimated Cost or Rs. 5,000/- whichever is higher
**Tender Fee** will be Rs. 500/- plus GST + 1% Labour Cess.
**Bid Submission:** From 10.07.2023 @ 00:00 Hrs to 16.07.2023 @ 23:59 Hrs for above tender. For further details, visit our website **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person:** The Add'l Executive Engineer, (O): Phone No. 7373101089
**Note:** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Executive Engineer**
**EHV (O&M) Dn., Mahad**


# श्रीवर्धनमध्ये राजमाता जिजाऊ युवती स्वसंरक्षण प्रशिक्षण सुरू

**श्रीवर्धन : बातमीदार**

शासनाच्या महिला व बालविकास विभागातर्फे राजमाता जिजाऊ युवती स्वसंरक्षण प्रशिक्षण कार्यक्रम श्रीवर्धन येथील गोखले महाविद्यालयामध्ये शुक्रवारी (दि. ६) आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाचे उद्घाटन प्राचार्य श्रीनिवास जोशी यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमामध्ये प्रमुख मार्गदर्शन भारतीय स्त्रीशक्ती प्रमुख विभा करमरकर यांनी उपस्थित विद्यार्थिनींना केले.



या कार्यक्रमासाठी १००पेक्षा अधिक विद्यार्थिनींची उपस्थिती होती. या वेळी भारतीय स्त्रीशक्ती प्रमुख विभा करमरकर, एकात्मिक बालविकास योजना प्रकल्प अधिकारी अमिता भायदे, विस्तार अधिकारी भरत कुबेर, गोखले महाविद्यालयाचे उपप्राचार्य किशोर लहारे, विद्यार्थी निधी ट्रस्ट श्रीवर्धन तालुक्याच्या प्रमुख स्नेहा संतोष चौकर, सदस्य स्वामिनी तोडणकर उपस्थित होत्या.

सध्या महिला, युवतींवर अत्याचारांचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे युवती व महिलांना स्वतःचे संरक्षण करता यावे, यासाठी शासनाने हा कार्यक्रम हाती घेतला आहे.

कार्यक्रमाच्या दुसऱ्या दिवशी विद्यार्थिनींना स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण देण्यात आले. यासाठी खोपोली येथून प्रशिक्षक धीरज पंडित, नितीन बोनदाडे, निकिता मांडवकर आले होते. यानंतर ११ ते १३ जुलैदरम्यान र. ना. राऊत विद्यालयात स्वसंरक्षण प्रशिक्षणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

# रोहा लायन्स क्लब अध्यक्षपदी सुस्मिता शिट्यालकर

**धाटाव : प्रतिनिधी**

लायन्स क्लब रोहाचा पदग्रहण सोहळा मावळते अध्यक्ष अब्बास रोहावाला यांच्या अध्यक्षतेखाली धाटाव येथे बुधवारी (दि. ५) झाला. त्यामध्ये सर्वानुमते सुस्मिता शिट्यालकर यांची अध्यक्षपदी निवड करण्यात आली.

नूतन कार्यकारिणीमध्ये उपाध्यक्ष भाऊसाहेब माने, लक्ष्मण शिट्यालकर, सेक्रेटरी रशिदा रोहावाला, सहसेक्रेटरी डॉ. कृष्णा जराग, खजिनदार वर्षा सातपुते, सहखजिनदार प्रमोद जैन, पराग फुकणे, बोर्ड ऑफ डायरेक्टर नुरुद्दिन रोहावाला, रवींद्र घरत, प्रदीप दामानी, प्रद्युत कुलकर्णी, हेमंत गांगल, नितेश कटारिया, डॉ तुषार राजपूत, डॉ. रुपेश, ईल्यास डबीर, तोसिफ येरुनकर यांना परमेश्वरम यांनी शपथ दिली.


**नमुना एन. डी.**
(नियम ९२(३) पहा)
परवानाधारकाच्या उत्तराधिकाऱ्याने वृत्तपत्रात प्रसिद्ध करावयाच्या नोटीसीचा नमुना

लोकांच्या माहितीसाठी याद्वारे कळविण्यात येते की, परवाना क्र. MH46/CC/AUTO/2018/656 मध्ये समाविष्ट असलेल्या मोटार वाहन क्र. MH46 AZ 3913 चे मालक **अरविंद वसंत जाधव** यांचे तारीख ०२/०६/२०२१ रोजी निधन झालेले आहे.

मी **प्राजक्ता अरविंद जाधव,** पत्ता : घर नं.५६०/बी, टाटा हॉस्पिटलमागे, मु.ओवे कॅम्प गाव, खारघर, ता. पनवेल, जि. रायगड उपरोल्लेखित वाहनाच्या कब्जाचा उत्तराधिकारी असल्यामुळे सदर परवान्याचा वापर करण्याचा माझा इरादा आहे. आणि त्यानुसार, त्या परवान्याचे माझ्या नावावर हस्तांतरण होण्यासाठी मी योग्य त्या प्राधिकरणाकडे/प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे/प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे अर्ज केलेला आहे.

या बाबतीत कोणताही दावा सांगणाऱ्या किंवा हरकत असलेल्या कोणत्याही व्यक्तीने ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत असा दावा किंवा हरकत प्रादेशिक परिवहन कार्यालय पनवेलच्या/प्रादेशिक परिवहन प्राधिकरण पनवेलच्या निर्दशनास आणून दिली पाहिजे.

**उत्तराधिकाऱ्याचे नाव – प्राजक्ता अरविंद जाधव,**
**पत्ता : घर नं.५६०/बी, टाटा हॉस्पिटलमागे, मु.ओवे कॅम्प गाव, खारघर, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२१०**

# ४८ तासांत खड्डे न बुजविल्यास ठेकेदारास दंड

## नवी मुंबई महापालिका आयुक्तांचे अभियंत्यांना कारवाईचे निर्देश

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

पावसाळी कालावधीत आवश्यक दक्षता घेण्याचे व परस्पर समन्वय राखण्याचे निर्देश पालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांनी शहर अभियंता विभागाला दिले असून याबाबत खबरदारी म्हणून व तत्काळ खड्डे दुरुस्ती करण्यासाठी विभागवार पथके तयार करण्यात आली आहेत. त्यामुळे शहरात खड्डे पडताच तत्काळ ते बुजवण्याबाबतची दक्षता पालिकेकडून घेण्यात येत असल्याची माहिती पालिकेच्या अभियंता विभागाने दिली आहे, तर ४८ तासात खड्ड्यांची दुरुस्ती न केल्यास ठेकेदाराला दंड करण्यात येणार आहे.

शहरात २५ जूनपासून पावसाला सुरवात होताच पालिका आयुक्त राजोश नार्वेकर यांनी शहरातील दौरा केला होता. त्या वेळी काही ठिकाणी सुरू असलेल्या रस्त्यांच्या कामांबाबत



ही कामे त्वरित थांबविण्याचे व सदर रस्ते वाहतूकीसाठी खुले करण्याचे निर्देश आयुक्तांनी अभियांत्रिकी विभागास दिले होते. त्याचप्रमाणे रस्त्यावरील खड्डे दुरुस्तीबाबतही तत्पर कार्यवाहीचे निर्देशित केले आहेत.

त्यामुळे पावसाळ्यात रस्त्यावर खड्डे पडताच तत्काळ दुरुस्ती केला जाणार आहे. नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील रस्ते सुस्थितीत रहावेत याकरिता नवी मुंबई महानगरपालिकेने रस्ते दुरुस्तीचे वार्षिक देखभाल, दुरुस्ती ठेका देण्यात आला आहे. त्यांच्यामार्फत रस्ते दुरूस्तीवर विशेष लक्ष दिले जात असून याकरिता विभागनिहाय आठ तसेच एमआयडीसी क्षेत्राकरिता दोन अशा एकूण १० कंत्राटदारांची नेमणूक करण्यात आलेली आहे. त्यांच्यामार्फत नियमितपणे रस्ते पाहणी करून त्याची दुरुस्ती करण्यात येते याशिवाय नवी मुंबई महापालिकेच्या नागरिक तक्रार निवारण प्रणालीवर तसेच विविध माध्यमांद्वारे प्राप्त होणाऱ्या रस्त्याबाबतच्या तक्रारींवर त्वरित दुरुस्ती कार्यवाही करण्यात येत आहे.

> **पावसाळी कालावधीत रस्ते सुव्यवस्थित राहण्याबाबत महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या निर्देशानुसार अभियंता विभागामार्फत विशेष दक्षता राखणेबाबत आठही विभागांचे कार्यकारी अभियंता व सर्व अभियंतावर्गास तसेच कंत्राटदारांस काटेकोर सूचना देण्यात आली. पावसाळ्यात कोणतीही अडचण निर्माण होणार नाही याबाबत खबरदारी बाळगण्यात येत आहे.**
> **–संजय देसाई, शहर अभियंता**

कंत्राटदारांमार्फत ४८ तासात दुरूस्ती कार्यवाही करण्यात न आल्यास दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे. पावसाळी कालावधीत नवी मुंबई महानगरपालिकेने विभागवार रस्ता दुरुस्ती पथके तयार केली असून पावसाळ्याच्या अनुषंगाने कोल्ड मिक्सड अस्फाल्टचा रस्ते दुरुस्तीसाठी वापर करण्यात येत आहेत. नागरिकांची कोणतीही गैरसोय होऊ नये, याबाबत नवी मुंबई महानगरपालिका दक्ष असून पालिका आयुक्तांच्या निर्देशानुसार दुरुस्तीची कार्यवाही जलद करण्यावर भर दिला जात असल्याची माहिती अभियंता विभागाने दिली आहे.

## निवडक

### वावेघर येथे वृक्षारोपण, बियाणे वाटप



**मोहोपाडा :** ग्रुप ग्रामपंचायत वावेघर यांच्या वतीने ग्रामसेवक निवृत्ती आंधळे व उपसरपंच विलास हासूराम माळी यांच्या सहकार्याने कार्यक्रम पार पाडला. नवसंजीवनी ग्रामसंघ वावेघर व शिवकन्या प्रभाग संघ गुळसुंदे अध्यक्ष रेश्मा माळी, सीआरपी प्रणया माळी, सचिव अमृता माळी, लिपिका रश्मी माळी यांच्या अध्यक्षतेखाली वावेघर गावातील सर्व बचत गटांच्या सहकार्याने वृक्षारोपण व बियाणे वाटप करण्यात आले. या वेळी परिसरात वृक्षारोपण करून संवर्धन करण्याची जबाबदारी घेण्यात आली.

### विद्यार्थ्यांना साहित्य व खाऊवाटप



**उरण :** चिरनेर रांजणपाडा येथील ब्रदर फॉरेवर ग्रुप रांजणपाडाच्या तरुणांनी राजिप प्राथमिक शाळा चांदायलेवाडी येथे शुक्रवारी (दि. ७) विद्यार्थ्यांना दप्तर, लेखन साहित्य, छत्री वाटप केले, तसेच विद्यार्थ्यांना दुपारचे जेवण देण्यात आले. शाळेतील मुख्याध्यापक आणि शिक्षक वर्ग यांनी ब्रदर फॉरेवर ग्रुप रांजणपाडा चिरनेर यांचे या भेटीबद्दल आभार मानले. या वेळी वाडीवरील रोशन कातकरी, विजया कातकरी हे उपस्थित होते.

### कोकण विभागात ७२ मिमी पाऊस

**नवी मुंबई :** कोकण विभागात शुक्रवारी (दि. ७) सरासरी ७२ मिमी पावसाची नोंद झाली आहे. सर्वाधिक पावसाची नोंद रत्नागिरी जिल्ह्यात ९२.५ मिमी झाली आहे. कोकण विभागात आत्तापर्यंत एकूण ३५७.२ मिमी पावसाची नोंद झाली आहे. जिल्हानिहाय पावसाची आकडेवारी ठाणे ४०.१ मिमी, पालघर ५९.१ मिमी, रायगड ६२.८ मिमी, रत्नागिरी ९२.५ मिमी, सिंधुदुर्ग ८७.५ मिमी अशी आहे.

### वाहनाच्या धडकेत पादचाऱ्याचा मृत्यू

**पनवेल :** अज्ञात वाहनाच्या धडकेत एका पादचाऱ्याचा मृत्यू झाल्याची घटना तालुक्यातील नेरे गावात घडली आहे. कोलीकोपर कातकरवाडी येथील महादेव वाघे (४०) हे नेरे येथे गाई गोठ्यात नेण्याचे काम करीत होते. या वेळी नेरे हायस्कूलसमोरील रस्त्याकडे जाणाऱ्या झाडाखाली आराम करत असताना रस्त्यावरून धावणाऱ्या एका भरधाव कारची वाघे यांना धडक बसली. यात महादेव वाघे जखमी झाले. त्याला उपचारासाठी एमजीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

# सिडकोतर्फे व्हॅली गोल्फ कोर्स येथे वृक्षारोपण

## ४० हजार रोपांची लागवड करण्याचे लक्ष्य



**नवी मुंबई : सिडको वृत्तसंस्था**

सिडकोच्या वृक्षारोपण मोहिमेचा शुभारंभ शुक्रवारी (दि. ७) नवी मुंबईतील सिडकोच्या खारघर व्हॅली गोल्फ कोर्स येथे करण्यात आला. उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक अनिल डिग्गीकर यांच्या हस्ते वृक्षारोपण करून या मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला.

नवी मुंबईमध्ये ४० हजार इतक्या वृक्षांची लागवड करण्याचे सिडकोचे लक्ष्य आहे.

या वेळी सहव्यवस्थापकीय संचालक राजेश पाटील, शांन्तनु गोयल, डॉ. कैलास शिंदे, मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे यांच्यासह सिडकोतील विभाग प्रमुख, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

सिडकोने नवी मुंबईतील पर्यावरण संरक्षण आणि संवर्धनास नेहमीच प्राधान्य दिले असून, पर्यावरण संवर्धनाकरिता सिडकोतर्फे नवी मुंबईतील विविध ठिकाणी वृक्षारोपणाचे कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. सिडकोतर्फे पर्यावरणाचा समतोल राखत विकास केला जातो हे यावरून स्पष्ट होते. वृक्षारोपण उपक्रमांतर्गत नवी मुंबईतील खारघर, कामोठे, नावडे, उलवे, द्रोणागिरी इ. नोडमध्ये सुरू, कांचन, ताम्हण, कडुलिंब, बहावा, करंज, कदंब, बकुळ, सिता अशोक, पुत्रंजिवा, वड, पिंपळ, उंबर इ. प्रजातींच्या ४० हजार वृक्षांची लागवड सिडकोतर्फे करण्यात येणार आहे.

# कंटनेरचा ब्रेक फेल झाल्याने अपघात; पाच गाड्यांचे नुकसान

## प्रवासी महिला जखमी

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवसारीकडून मुलुंडकडे सिमेंट घेऊन जाणाऱ्या कंटेनरचा ब्रेक झाल्याने हा कंटेनर चार गाड्या आणि एका रिक्षाला धडकला. यात रिक्षातील एक प्रवासी महिला किरकोळ जखमी झाली आहे. हा अपघात ठाणे बेलापूर मार्गावरील रबाळे अंडरबायपास येथे झाला आहे. अपघातामुळे पाऊण तास वाहतूक कोंडी झाली होती.

नवसारी येथून मुलुंड येथे सिमेंट घेऊन एक कंटेनर जात होता. साडेबाराच्या सुमारास रबाळे एमआयडीसीतून ऐरोलीच्या दिशेने जाताना अंडरपासच्या ऐन उतारावर या कंटेनरचा ब्रेक निकामी झाला. उतारावर ब्रेक निकामी झाल्याने कंटेनर एकदम सुसाट खालच्या दिशेने जात असल्याने कंटेनर चालकाने पदपथावर कंटेनर चढवला, मात्र तरीही कंटेनरवर नियंत्रण न राहिल्याने रस्त्यावरून जाणाऱ्या असलेल्या पाच गाड्यांना कंटेनरने जोरदार धडक दिल्याने मोठा अपघात झाला आहे. यामध्ये आर्टिगा, रिक्षा, टेम्पो, होंडासिटी व



महिंद्रा एक्सयुव्ही अशा पाच गाड्यांना धडक दिल्याने या गाड्यांचे नुकसान झाले आहे.

रिक्षा तर पूर्णपणे चेपली गेली असून यातील एक महिला प्रवासी किरकोळ जखमी झाली आहे. या जखमी महिलेला रिक्षातून बाहेर काढताना एक पोलीस कर्मचारी जखमी झाला आहे. सुदैवाने या अपघातात कोणतीही जीवितहानी झालेली नाही. घटनास्थळी पोलीस व वाहतूक पोलीस उपस्थित होते. अपघात वेळी वाहतूक कोंडी झाली, मात्र या ठिकाणी वाहतूक पोलीस उपस्थित असल्याने फार वेळ वाहतूक कोंडी झाली नाही.

# कचऱ्यामुळे होणारे प्रदूषण टाळणे व ऊर्जानिर्मिती कार्यशाळा

**नवी मुंबई : बातमीदार**

केंद्रीय सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाचे सचिव आणि भारताचे मुख्य सांख्यिकी तज्ज्ञ डॉ. जी. पी. सामंता यांच्या प्रमुख उपस्थितीत शुक्रवारी (दि. ७) नवी मुंबईच्या एनएसएसओ म्हणजेच राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण कार्यालयात स्वच्छता पंधरावड्याचे आयोजन करण्यात आले होते. यानिमित्त मुंबईच्या एनएसएसओ (एफओडी) प्रादेशिक कार्यालयाने पर्यावरण रक्षणासाठी कचऱ्याचे व्यवस्थापन या विषयावर एका कार्यशाळेचेही आयोजन केले होते

स्वच्छता आपल्याला, अभिमान आणि आत्मसन्मानाची जाणीव करून देते, असे विचार डॉ. सामंता यांनी व्यक्त केले. स्वच्छतेमुळे केवळ शारीरिकच नाही, तर मानसिक आरोग्यही उत्तम राखता येते. त्यामुळे स्वच्छतेचा नियम हा केवळ १५ दिवसांसाठीचा उपक्रम म्हणून नाही, तर नियमितपणे आपले कर्तव्य म्हणून पाळला जावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. स्वच्छता पंधरवडा हा आपल्या सर्वांना एकत्रित आणून, परिसरात लक्षणीय बदल घडवणारा एक मंच आहे, असेही ते पुढे म्हणाले.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे उपप्रादेशिक अधिकारी विक्रांत भालेराव यांनी प्लास्टिक कचरा व्यवस्थापन या विषयावर सादरीकरण करून प्लास्टिक कचऱ्याची निर्मिती, अशा कचऱ्याचे धोके आणि सुरक्षित विल्हेवाट याविषयी माहिती दिली. घरगुती कचऱ्याची सुरक्षित विल्हेवाट आणि महानगरपालिकेद्वारे कचऱ्याची विल्हेवाट लावण्याबाबत नवी मुंबई महानगरपालिकेचे अतिरिक्त शहर अभियंता शिरीष आरदवाड यांनी सविस्तर माहिती दिली. घनकचरा व्यवस्थापनावर चर्चा केंद्रित करत त्यांनी सुका कचरा, ओला कचरा आणि इतर धोकादायक कचरा अशा तीन प्रकारच्या कचऱ्याच्या संकलनाची माहिती दिली. पुढील वापराच्या दृष्टीनं ओल्या कचऱ्याचे खतामध्ये रूपांतर केले जाते आणि भविष्यात, २०५०पर्यंत कचऱ्याचे ऊर्जेत रूपांतर करणारे ऊर्जा प्रकल्प उभारण्याची संबंधित प्राधिकरणाची योजना आहे, असे त्यांनी नमूद केले. त्याचवेळी ई–वाहनांच्या वापराला प्रोत्साहन देणे इत्यादी काही कौतुकास्पद पावले उचलून सरकार हवेची गुणवत्ता सुधारण्याचे काम करीत आहे, अशी माहिती त्यांनी दिली.

मुंबई कचरा व्यवस्थापनाचे संचालक सोमनाथ मलगर यांनी कचरा प्रदूषण आणि कचरा व्यवस्थापन या विषयावर सादरीकरण केले. देवनार प्रकल्पाचे प्रमुख अयाज हुसेन यांनी पुर्नशाश्वतता या विषयावर जनजागृती करण्यासाठी कचऱ्यापासून ऊर्जा या विषयावर सविस्तर सादरीकरण केले. कार्यक्रमात सुमारे १२० अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले होते.



# गावच्या सुरक्षेसाठी सर्वांनी दक्ष राहावे

## सहाय्यक पोलीस आयुक्त अशोक राजपूत यांचे आवाहन

**पनवेल : वार्ताहर**

गावाच्या सुरक्षेसाठी पोलीस पाटील, सरपंच, महिला दक्षता समिती सदस्यांनी दक्ष राहावे, असे आवाहन सहाय्यक पोलीस आयुक्त अशोक राजपूत यांनी पनवेल तालुका पोलीस ठाणे हद्दीतील समन्वय बैठकीत केले.

पनवेल विभाग सहाय्यक पोलीस आयुक्त अशोक राजपूत यांचे मार्गदर्शनाखाली पनवेल तालुका पोलीस ठाणे, मंथन हॉल येथे घेण्यात आलेल्या या बैठकीला वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल पाटील उपस्थित होते. या बैठकीत राजकिय परिस्थिती, पावसाळा, धरणे, धबधबे आदी ठिकाणी सुरक्षेच्या अनुषंगाने तसेच लोकसहभागातून हद्दीत सीसीटीव्ही कॅमेरे बसून गावाची सुरक्षेच्या दृष्टीने सहाय्यक पोलीस आयुक्त अशोक राजपूत यांनी उपस्थितांना सूचना केल्या.

बैठकीत ग्रामीण भागात गावठी दारू, अवैध धंदेबाबत माहिती देणे



तसेच सोसायटीमध्ये भाडेकरू राहत असतील त्यांची माहिती ऑनलाईन पद्धतीने देणेबाबत सूचना केल्या आहेत. त्याचप्रमाणे सध्याचे पावसाळी वातावरण असल्याने धबधबे, धरणांवर पर्यटक येत असतात. सुरक्षेच्या अनुषंगाने पोलीस ठाणेकडून मनाई आदेश फलक प्रसारीत केला आहे, तसेच दरड कोसळणारे ठिकाणाची माहिती, पाणी साचणारे ठिकाण व त्यातून जीवितहानी होऊ नये याकरिता पोलीस पाटील, सरपंचांना योग्य त्या सूचना दिल्या आहेत.

आपत्कालीन परिस्थितीत तत्काळ पोलीस मदतीकरीता ११२ या क्रमांकावर संपर्क करण्यात यावा, तसेच प्रत्येक गावातील कायदा सुव्यवस्थेच्या दृष्टीने काही महत्त्वाचे प्रश्न असल्यास फोनद्वारे किंवा पोलीस पाटील यांच्या ग्रुपवर शेअर करावा, सण उत्सव, संशयित व्यक्ती, बेवारस वाहन, संशयित वस्तूंबाबत माहिती देण्याबाबत योग्य त्या सूचना सहाय्यक पोलीस आयुक्त अशोक राजपूत यांनी उपस्थितांना केल्या.

या बैठकीला पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल पाटील, पोलीस निरीक्षक (गुन्हे) जगदीश शेलकर, गोपनीय विभागाचे कुंवर, पंकज शिंदे व होलकर यांच्यासह पोलीस पाटील, सरपंच, महिला दक्षता समिती सदस्य उपस्थित होते.

# भरधाव रिक्षाची दुचाकीला धडक; महिला जखमी

**पनवेल : वार्ताहर**

भरधाव वेगाने आलेल्या रिक्षाने मोटरसायकलला धडक दिल्याने दुचाकीवर बसलेली महिला जखमी झाल्याची घटना खारघर येथे घडली आहे. याप्रकरणी रिक्षाचालकाविरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

विपिन चव्हाण हे बहीण दर्शना राठोड हिच्यासह दुचाकीवरून जात होता. या वेळी खारघर परिसरात भरधाव जाणाऱ्या रिक्षाची त्यांच्या दुचाकीला धडक बसली. या धडकेत दोघेही खाली पडले. यामध्ये दर्शना राठोड या जखमी झाल्या.

याप्रकरणी रिक्षा चालकाविरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# पनवेल बाजारपेठेत मक्याच्या कणसांची आवक

**पनवेल : वार्ताहर**

पावसाळा सुरू झाला असल्याने मक्याच्या कणसांना मागणी वाढली आहे. त्यानुसार पनवेलच्या बाजारात कणसांची आवक वाढत आहे. सध्या बाजारात एक कणीस १० रुपयांना मिळत आहे.



पावसाळा हा मक्याच्या कणसाचा मुख्य हंगाम आहे. या काळात पांढरा, गावठी मका बाजारात येत असतो. काही वर्षांपासून हा पांढरा गावठी मका शेतातूनच हद्दपार झाला असल्याने बाजारात आता वर्षभर पिवळ्या मक्याची कणसे अर्थात 'स्वीट कॉर्न' पाहायला मिळतात. काहीसा पांढरा असणारा मका हा गावठी कणीस म्हणून ओळखला जातो. हा कणीस केवळ पावसाळ्यातच पाहायला मिळतो. या काळात त्याला जास्त मागणी असते. सध्या किरकोळ बाजारात एक कणीस १० रुपयांना मिळत आहे, तर भाजलेला मका अर्थात भुट्टा १५ ते २० रुपयांना मिळत आहे.



**पनवेल : महिला दक्षता कमिटीने गुरुवारी न्हावा शेवा पोलीस स्टेशन येथे वरीष्ठ निरीक्षक संजीव धुमाळ यांची भेट घेत विविध विषयांवर चर्चा केली. या वेळी भाजप महिला मोर्चा तालुकाध्यक्ष रत्नप्रभा घरत, स्नेहलता ठाकूर, रेखा घरत, योगसाधना पाटील, आश्रया पाटील, प्रिती ठाकूर, हिना घरत, रंजना तांडेल, सुजाता कडू, महिला पोलीस उपनिरीक्षक आश्विनी कांबळे, हवालदार मनोज जाधव, सचिता म्हात्रे, कनिष्का नाईक आदी उपस्थित होते.**



(छाया : सलीम शेख)

# शेतकऱ्यांना आता भात लागवडीचे वेध!

**माणगाव : प्रतिनिधी**

गेल्या १५ दिवसांपासून पडत असलेल्या समाधानकारक पावसामुळे भाताची रोपे चांगलीच वाढली असून येत्या दोन दिवसांत शेतकरी भात लागवडीच्या कामाला लागणार आहे. भाताच्या लागवडीला पोषक पाऊस असल्याने शेतकरीवर्ग समाधानी आहे. यंदा माणगाव तालुक्यात १२,५०० हेक्टरवर भात लागवड होणार असून शेतकऱ्यांना भात लागवडीचे वेध लागले आहे.

माणगाव तालुक्यातील बहुतांशी शेतकऱ्यांनी रोहिणी नक्षत्र निघाल्यानंतर धूळ वाफेवर विविध जातीच्या भात बियाण्यांची पेरणी केली होती. दरवर्षी साधारण ७ जूनला पाऊस येणार या आशेवर शेतकरी होते, मात्र मृग नक्षत्रही संपत आल्यामुळे रुजवा झालेला तरवा पावसाअभावी करपू लागला होता. तालुक्यातील पारंपरिक भातशेतीसह लाल व काळ्या भातपिकाच्या वाणाची पेरणी व लागवड शेतकऱ्यांनी केल्यास आधुनिकीकरणाच्या भात पिकातून शेतकऱ्यांना शाश्वत उत्पादन मिळेल. यासाठी विविध संस्था शेतकऱ्यांना मदतीसाठी पुढे सरसावत आहेत. त्यामुळे माणगावचा शाश्वत भातपीक उत्पादनाचा पॅटर्न जिल्ह्यासाठी प्रभावी व उपयुक्त ठरणार आहे. याबाबत नव नवीन तंत्रज्ञान पुढे येत आहे. याचा फायदा शेतकऱ्यांना मिळू शकतो.

माणगाव तालुक्यात भाताचे तरवे तरारले असून दोन दिवसांत लागवड सुरू होणार असल्याने शेतकरी मशागतीच्या कामाला लागला आहे.

# मुरूड शहरात वाहतूक कोंडी

**मुरूड : प्रतिनिधी**




(छाया : संजय करडे)

मुरूड शहरात वाहतूक कोंडीची समस्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. विशेषतः बाजारपेठेत वाहतूक समस्या बिकट होत चालली आहे.

अनेक चालक आपली वाहने रस्त्याच्या दोन्ही बाजूस गाड्या बिनधास्तपणे लावत आहे आणि आपल्या गाडीजवळ उभे न राहता गाडी बंद करून तिथून निघून जात असल्याने वाहतूक कोंडी होत आहे. याचा त्रास सामान्य नागरिकांना होत आहे. ट्रॅफिक पोलिसांनी त्यांच्यावर कडक कारवाई करावी, जेणेकरून रस्त्यावर गाडी लावताना विचार करतील, असे म्हटले जात आहे.

याशिवाय मुख्य बाजारपेठेत किराणा मालाची दुकाने आहेत. मोठ मोठे ट्रक माल घेऊन येतात त्या वेळीसुद्धा वाहनकोंडी होत असते. ट्रॅफिक पोलीस हे बाजारपेठेत सातत्याने राहणे आवश्यक असताना काही वेळा ते नसल्याने वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात होऊन तासन्‌तास वाहनांना एकाच ठिकाणी उभे रहावे लागत असते. यावर उपाययोजना करण्याची मागणी होत आहे.

# ‘हिरवळ’च्या विद्यार्थ्यांचे विद्यापीठस्तरीय परीक्षेत यश




**माणगाव : प्रतिनिधी**

मुंबई विद्यापीठाच्या तृतीय वर्ष बीएमएस (व्यवस्थापन अभ्यास) निकालामध्ये हिरवळ एज्युकेशन ट्रस्टच्या महाड येथील कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स ॲण्ड इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवले.

महाविद्यालयाच्या तृतीय वर्ष बीएमएस (व्यवस्थापन अभ्यास) शाखेचा निकाल ८४.६१% लागला असून एचआर विभागातून लिना अकबर अली सैन ९.६८ सिजीपीआय मिळवून प्रथम, अमृता राधाकृष्णन उन्नीथान ९.३३ सिजीपीआय मिळवून द्वितीय, तर अशिती हनुमंत पवारने ८.८४ सिजीपीआय प्राप्त करून तृतीय क्रमांक पटकावला आहे. फायनान्स विभागातून शालिना सज्जाद मुरुडकर ९.१९ सिजीपीआय गुण मिळवून प्रथम, नोहा साजिद हजवाने ८.४८ सिजीपीआय गुण मिळवून द्वितीय, तर रीबा मुसद्दिक खानदेशी याने ८.४७ सिजीपीआय गुण मिळवून तृतीय क्रमांक पटकावला आहे. इतर विद्यार्थ्यांनीदेखील उत्तम गुण मिळवून यश प्राप्त केले आहे.

हिरवळ एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष किशोर भाई, संचालिका सोनाली धारिया यांनी यशवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील जीवनात यशस्वी होण्याकरिता आपल्यातल्या सुप्त कलागुणांना ओळखून करिअर निवडण्याचा सल्ला दिला व भावी वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या. संस्थेच्या प्रमुख सल्लागार डॉ.संध्या कुलकर्णी, महाविद्यालयाचे प्राचार्य सुदेश कदम, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# पेणमध्ये स्पेअर पार्ट दुकानाला आग; साहित्य खाक

**पेण : प्रतिनिधी**

पेण शहरात दुकानांना आगी लागण्याचे प्रमाण दिवसेंदिवस होत असून अशीच घटना शुक्रवारी (दि. ७) पहाटे ५.३०च्या सुमारास घडली. पेण बाजार समितीच्या कार्यालयाखाली असलेल्या ऑटो विंग या स्पेअर पार्टच्या दुकानात आग लागून या आगीत दुकानातील स्पेअर पार्ट साहित्य, टायर जळून खाक झाले असून मोठे नुकसान झाले आहे. सुदैवाने या आगीत कोणतीही जीवितहानी झाली नाही.

पेणमधील प्रवेशद्वाराजवळ बाजार समिती कार्यालयाच्या खाली असलेल्या गाळ्यांमधील ऑटोविंग हे स्पेअर पार्टचे दुकान असून शुक्रवारी पहाटे ५.३०च्या सुमारास आग



(छाया : अनिस मनियार)

लागल्याचे येथील जाणाऱ्या नागरिकांच्या लक्षात आल्यावर एकच गोंधळ उडाला.

या वेळी नगर परिषदेच्या अग्निशमन दलाची टीम व पोलीस उपनिरीक्षक समद बेग, पोलीस योगेश टेमकर व त्यांचे सहकारी हे घटनास्थळी पोहचले. फायर ब्रिगेडचे कर्मचारी अभिजीत गुरव, अभिषेक बंगाळे, आदित्य पाटील, चंद्रकांत गावंड, विशाल बामणे आदींनी तासाभरात आगीवर नियंत्रण मिळविले. या वेळी सुदैवाने आग इतरत्र पसरली नाही. दुकानातील स्पेअर पार्टचे साहित्य मात्र जळून खाक झाले. ही आग शॉर्टसर्किट झाल्याने प्राथमिक अंदाजावरून दिसून येत आहे. प्रशासनाने अशा घटनांबाबत जनजागृती करणे गरजेचे असून जेणेकरून या आगीच्या घटना वारंवार घडणार नाहीत.

# रोह्यातील भजन स्पर्धेत नवनूतन मंडळ प्रथम

## रोख रक्कम व सन्मानचिन्ह देऊन गौरव

**रोहे : प्रतिनिधी**

रायगडचे खासदार सुनील तटकरे यांच्या वाढदिवसानिमित्त राष्ट्रवादी रोहा शहराच्या वतीने भजन स्पर्धा रोहा शहरातील ज्येष्ठ नागरिक सभागृहात आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत नवनूतन भजनी मंडळाने प्रथम क्रमांक पटकावला. त्यांना रोख रक्कम व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

या स्पर्धेत ११ भजनी मंडळांनी सहभाग घेतला होता. या वेळी माजी नगराध्यक्ष संतोष पोटफोडे, रत्नप्रभा कापरे, राष्ट्रवादी शहर अध्यक्ष अमित उकडे, माजी उपनगराध्यक्ष महेंद्र गुजर, मानसी दाते, महेश कोलटकर, महेंद्र दिवेकर, ह.भ.प. बाळाराम शेळके महाराज, हेमंत ओक, रवी चाळके, जनार्दन देशमुख, चंद्रकांत पार्टे, स्वप्नील धनावडे, विनीत वाकडे, मयुर पायगुडे, अजित मोरे, दर्शन गुजर आदी उपस्थित होते. स्पर्धेचे परीक्षक म्हणून ह.भ.प.अंजली कवळे आणि संगीत विशारद विशाल चोरगे यांनी काम पाहिले.



(छाया : महादेव सरसंबे)

स्पर्धेत द्वितीय क्रमांक विठ्ठल रुक्मिणी भजन मंडळ, तृतीय ओम साई भजनी मंडळ, उत्तेजनार्थ भैरव दर्शन भजनी मंडळ तसेच उत्कृष्ट उत्कृष्ट हार्मोनियमवादक मिनल सुर्वे, उत्कृष्ट मृदंगवादक पांचाळ, उत्कृष्ट भजनी मंडळ अभंग सेवा मंडळ ठरले. सर्व विजेत्यांना रोख रक्कम व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. ही स्पर्धा श्रोत्यांना पर्वणी होती. स्पर्धेनिमित्त वातावरण भक्तिमय झाले होते.

# बापूसाहेब देशपांडे विद्यासंकुलात गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

**नागोठणे : बातमीदार**

कोकण एज्युकेशन सोसायटीच्या नागोठणे येथील बापूसाहेब देशपांडे संकुलनातील विद्यालय आणि कै. स. प्र. जैन कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता दहावी व बारावीच्या सन २०२२-२३च्या वार्षिक परीक्षेत प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव गुरुवारी (दि. ६) विद्यासंकुलातील सभागृहात करण्यात आला. शाळा समितीचे अध्यक्ष नरेंद्र जैन यांच्या हस्ते कार्यक्रम झाला.





(छाया : श्यामकांत नेरपगार)

या कार्यक्रमास विद्यासंकुलाचे प्राचार्य ए. सी. चुनके, शाळा समिती सदस्य अनिल काळे, ॲड. सोनल जैन, निवृत्त शिक्षक पी. एम. सोलेगावकर, शिक्षक प्रतिनिधी ए. आर. गावित, शिक्षकेतर प्रतिनिधी संतोष गोळे, सकाळ सत्र प्रमुख एन. एन. गायकवाड, दुपार सत्र प्रमुख आर. टी. झेडगे, आर. के. जगताप, कांचन पारंगे,साक्षी शिंदे, संध्याराणी सरगडे, मेघना म्हात्रे,मानसी शिंदे, कैलास गाडे,अमित म्हात्रे, प्रगती बहुरुपी आदी शिक्षकांसह पालक प्रतिनिधी दत्ता श्रीवर्धनकर तसेच विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

इयत्ता दहावीचे प्रथम आलेली सृष्टी दत्ता श्रीवर्धनकर, द्वितीय ब्रिजेश शिवनरेश मौर्या, तृतीय श्रावणी योगेंद्र चौलकर, बारावीत सायन्स शाखेत अव्वल क्रमांक पटकाविणारा नवनीत ललित लेंडी, द्वितीय अक्षता संजय खाडे, तृतीय तेजस मगन चव्हाण, कॉमर्स शाखेतील प्रथम शीतल रमेश भोईर, द्वितीय वासुदेव पाटील, तृतीय राहुल चंद्रकांत म्हात्रे, कला शाखेतील प्रथम खुशी संजय सिंग, द्वितीय वैष्णवी प्रमोद पाटील, तृतीय क्रमांकप्राप्त दर्पण गजानन भोईर या सर्वांचा सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक प्राचार्य ए. सी. चुनके व सूत्रसंचालन संध्याराणी सरगडे यांनी केले, तर आभार एन. एन. गायकवाड यांनी मानले.

# जमिनीच्या सुपिकतेकडे लक्ष द्यावे -यशवंत केंजळे



(छाया : विजय मांडे)

**कर्जत : प्रतिनिधी**

शेतकऱ्यांनी शासनाच्या विविध योजनांचा लाभ घ्यावा आणि त्याआधी शेतकऱ्यांनी आपल्या जमिनीची सुपीकता शाबूत ठेवण्याकडे लक्ष केंद्रित करावे, म्हणजे पिके घेण्यास अडचण येणार नाही, असा सल्ला कृषी उपसंचालक यशवंत केंजळे यांनी शेतकऱ्यांना दिला.

तालुक्यातील बीड गावामध्ये कृषी संजीवनी सप्ताहानिमित्त शेतकरी मेळावा आयोजित केला होता. या मेळाव्यास स्थानिक सरपंच प्रभावती लोभी तसेच विभागीय कृषी अधिकारी फुलसुंदर, तालुका कृषी अधिकारी अशोक गायकवाड, तालुका मंडळ कृषी अधिकारी दिनेश कोळी आदी प्रमुख उपस्थित होते.

विभागीय अधिकारी फुलसुंदर यांनी शेतकऱ्यांनी विविध प्रकारची फळझाडे यांची लागवड करण्यासाठी प्राधान्य द्यावे, असे आवाहन केले, तर तालुका कृषी अधिकारी अशोक गायकवाड यांनी पंतप्रधान किसान योजना आणि कृषी विमा याद्दल माहिती देवून शेतकऱ्यांनी यासाठी भाग घेऊन सहकार्य करावे असे आवाहन केले.

कृषी पर्यवेक्षक मंगेश गलांडे, सुदर्शन वायसे यांनी वेगवेगळा योजनांची माहिती दिली. सरबत प्रक्रिया करणारे नेरळ येथील उद्योजक क्षीरसागर यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमात एमआरईजीएस अंतर्गत लाभार्थ्यांना आंबा कलमांचे वाटप करण्यात आले तसेच भाजीपाल्याचे मिनी किटचेदेखील वाटप करण्यात आले. कृषी संजीवनी सप्ताह यशस्वी होण्यासाठी तालुका मंडळ कृषी अधिकारी दिनेश कोळी, कृषी सहाय्यक श्रद्धा देवकर यांनी नियोजन केले होते.

शासनाच्या वतीने शेतकऱ्यांना सातत्याने मार्गदर्शन व सहकार्य करण्यात येत असते. हा शेतकरीवर्गाला आधार आहे.

# श्री धावीर नाम सप्ताहाला प्रारंभ

**रोहे : प्रतिनिधी**

रोह्याचे ग्रामदैवत असलेल्या श्री धावीर महाराजांच्या नाम सप्ताहाला ब्राह्मण मंडळातर्फे शुक्रवारी (दि. ७) श्री ओंकारेश्वर मंदिर येथे उत्साहात व भक्तिमय वातावरणात सुरुवात झाली. श्री धावीर नाम सप्ताहाचे यंदा १२३वे वर्ष असून सात दिवस देवासमोर झांज सतत सुरू असते हे या सप्ताहाचे वैशिष्ट्य आहे.

या वर्षी या नाम सप्ताहाच्या निमित्ताने विविध कार्यक्रमांची रेलचेल असून ब्राह्मण मंडळ कमिटीने उत्सवाची जय्यत तयारी केलेली आहे. मंडळाचे अध्यक्ष अमित आठवले यांनी देवासमोर श्रीफळ ठेवून या उत्सवाला प्रारंभ केला. या वेळी मंडळाचे सचिव निखिल दाते, सप्ताह प्रमुख सुहास फडके, खजिनदार चैतन्य आठवले, माजी अध्यक्ष हेमंत ओक, मिलिंद जोशी, मंदार भावे, विवेक बापट, उदय ओक, प्रकाश कुंटे, वासुदेव भिडे, नेहा आवळसकर, विदुला परांजपे, स्वाती पेंडसे आदींसह भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी आकर्षक सजावट व सकाळी म्हटले गेलेले सुरेल अभंग यामुळे वातावरणात भक्तीरसाची निर्मिती झाली होती. येणारा प्रत्येक भक्तगण भक्तिरसात तल्लीन होत होता.



# नवीन पिढीने र. वा. दिघे यांच्या साहित्याचा अभ्यास करावा -नितीन भावे

**खोपोली : प्रतिनिधी**

कोकणच्या मातीतील शेतकरी साहित्यिक ‘पाणकळा’कार कै. र. वा. दिघे यांच्या कसदार लेखणीची तत्कालीन साहित्यिक आणि समीक्षक दखल घेत असत. अनेक अभ्यासकांनी, साहित्यिकांनी त्यांच्या साहित्यातील विविध पैलू उलगडल्यामुळे दिघे यांचे मराठी साहित्यातील योगदान जगासमोर आले, परंतु दुर्दैवाने र. वा. दिघे यांचे साहित्य ज्या परिसरात फुलले त्या खोपोलीतील नवीन पिढी अभ्यास करताना दिसत नाही, अशी खंत पत्रकार नितीन भावे यांनी व्यक्त केली.



(छाया : जयवंत माडपे)

कोकण मराठी साहित्य परिषदेच्या वतीने येथील ब्राह्मण सभा सभागृहात दिघे यांच्या ४३व्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे या नात्याने भावे बोलत होते. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ पत्रकार जयवंत माडपे, प्रशांत गोपाळे, हनुमंत मोरे, संदीप ओव्हाळ, संतोषी म्हात्रे, कोमसाप अध्यक्षा उज्ज्वला दिघे, कै. र. वा. दिघे यांचे सुपुत्र वामनराव दिघे, रेखा कोरे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कवयित्री नलिनी पाटील होत्या.

उज्ज्वला दिघे यांनी प्रास्ताविक केल्यानंतर कै. दिघे यांना कवितेतून आदरांजली वाहिली. प्रमुख पाहुणे प्रशांत गोपाळे यांनी र. वा. दिघे हे खोपोलीची ओळख असल्याचे सांगितले तसेच खालापूर प्रेस क्लबच्या वतीने र. वा. दिघे यांच्या नावाने पुरस्कार दिला जात असल्याचा आवर्जुन उल्लेख केला. डॉ. भाऊसाहेब नन्नवरे आणि वामनराव दिघे यांचीही भाषणे झाली. नलिनी पाटील यांनी आपले अध्यक्षीय विचार व्यक्त केले. त्यानंतर कोमसापच्या सदस्यांनी कविता वाचन केले तसेच काही सदस्यांनी आपल्या अंगातील कलागुण सादर केले. जनार्दन सताणे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. कार्याध्यक्ष नरेंद्र हर्डीकर यांनी आभार मानले. निशा दळवी यांनी पसायदान सादर केल्यानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

# नेदरलँड्सला वर्ल्डकपचे तिकीट

## स्कॉटलंडवर मात; अष्टपैलू बास डी लीडेचा झंझावात

**बुलवायो : वृत्तसंस्था**

अष्टपैलू बास डी लीडेच्या (पाच बळी आणि १२३ धावा) झंझावातामुळे नेदर्लँड्सने एकदिवसीय विश्वचषक पात्रता स्पर्धेतील 'सुपर सिक्स' फेरीच्या निर्णायक लढतीत स्कॉटलंडला चार गडी आणि ४३ चेंडू राखून पराभूत केले. यासह नेदरलँड्सने भारतात होणाऱ्या एकदिवसीय विश्वचषकाच्या मुख्य फेरीतील आपले स्थान निश्चित केले.



'सुपर सिक्स' फेरीतील गुरुवारी झालेल्या सामन्यात डी लीडेने उत्कृष्ट अष्टपैलू कामगिरी करताना नेदरलँड्सला एकहाती सामना जिंकवून दिला. प्रथम डी लीडेने वेगवान गोलंदाजी करताना स्कॉटलंडचा निम्मा संघ गारद केला. त्यामुळे स्कॉटलंडचा डाव ५० षटकांत ९ बाद २७७ धावांवर मर्यादित राहिला. त्यानंतर डी लीडेने फलंदाजीत आपली गुणवत्ता सिद्ध करताना ९२ चेंडूंत सात चौकार आणि पाच षटकारांच्या साहाय्याने १२३ धावांची अप्रतिम खेळी केली. त्यामुळे नेदरलँड्सने २७८ धावांचे लक्ष्य ४२.५ षटकांतच गाठत विजय नोंदवला. गुणतालिकेत स्कॉटलंडला मागे टाकण्यासाठी त्यांनी विजयी लक्ष्य ४४ षटकांत गाठणे गरजेचे होते.

या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना स्कॉटलंडने ९ बाद २७७ धावा केल्या होत्या. त्यांच्याकडून ब्रेंडन मॅकमलन (११० चेंडूंत १०६) आणि कर्णधार रिची बेरिंगटन (८४ चेंडूंत ६४) यांनी चांगल्या खेळी केल्या. प्रत्युत्तरात डी लीडेला विक्रमजीत सिंग (४९ चेंडूंत ४०) आणि सकीब झुल्फिकार (३२ चेंडूंत नाबाद ३३) यांनी साथ दिल्याने नेदरलँड्सला विजय मिळवता आला. डी लीडे आणि झुल्फिकार यांनी सहाव्या गडय़ासाठी ११.३ षटकांतच ११३ धावांची भागीदारी रचली.

'सुपर सिक्स' फेरीतील एक सामना शिल्लक असलेल्या श्रीलंकेने आठ गुणांसह अग्रस्थान मिळवत विश्वचषकातील प्रवेश आधीच निश्चित केला आहे. नेदरलँड्स आणि स्कॉटलंड यांच्या खात्यावर प्रत्येकी सहा गुण आहेत, मात्र नेदरलँड्सने सरस निव्वल धावगतीच्या बळावर एकदिवसीय विश्वचषकातील स्थान निश्चित केले.

नेदरलँड्सचा संघ पाचव्यांदा एकदिवसीय विश्वचषकाच्या मुख्य फेरीसाठी पात्र ठरला आहे. त्यांनी यापूर्वी १९९६, २००३, २००७, २०११मध्ये विश्वचषकात सहभाग नोंदवला होता.

> **विश्वचषकातील १० संघ**
> *भारत, पाकिस्तान, इंग्लंड, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, दक्षिण आफ्रिका, बांगलादेश, अफगाणिस्तान, श्रीलंका आणि नेदरलँड्स.*

विम्बल्डन टेनिस स्पर्धा

# जोकोव्हिच, त्सित्सिपास यांचे संघर्षपूर्ण विजय

**विम्बल्डन : वृत्तसंस्था**





सर्बियाचा २३ ग्रँडस्लॅम विजेता नोव्हाक जोकोव्हिच आणि ग्रीसचा पाचवा मानांकित स्टेफानोस त्सित्सिपास यांनी संघर्षपूर्ण विजयांसह विम्बल्डन ग्रँडस्लॅम टेनिस स्पर्धेत पुरुष एकेरी गटात आगेकूच केली. महिला एकेरीत चेक प्रजासत्ताकच्या पेट्रा क्विटोवा व व्हिक्टोरिया अझरेन्का यांनी विजय नोंदवले.

दुसऱ्या मानांकित जोकोव्हिचला विजयासाठी संघर्ष करावा लागला, मात्र त्याने मोक्याच्या क्षणी आपला खेळ उंचावत ऑस्ट्रेलियाच्या जॉर्डन थॉम्पसनवर ६-३, ७-६ (७-४), ७-५ अशी मात केली. अन्य चुरशीच्या सामन्यात त्सित्सिपासने ऑस्ट्रियाच्या डॉमनिक थीमवर ३-६, ७-६ (७-१), ६-२, ६-७ (५-७), ७-६ (१०-८) असा विजय मिळवला. इटलीच्या लोरेंझो मुसेट्टीने स्पेनच्या क्वामे मुनारला ६-४, ६-३, ६-१ असे नमवले. चौथ्या मानांकित नॉर्वेच्या कॅस्पर रूडला ब्रिटनच्या लियाम ब्रॉडीकडून ६-४,३-६, ४-६, ६-३, ६-० अशा पराभवाचा सामना करावा लागला.

महिला एकेरीत क्विटोवाने जॅस्मिन पाओलिनीवर ६-४, ६-७ (५-७), ६-१ असा विजय मिळवला. अझरेन्काने नादिया पोडोरोस्काला ६-३, ६-० असे पराभूत केले. ३५० जोकोव्हिचचा हा ३५०वा ग्रँडस्लॅम विजय ठरला. अशी कामगिरी करणारा तो रॉजर फेडररनंतरचा (३६९) केवळ दुसरा पुरुष टेनिसपटू ठरला आहे.

---

# तेनझिंग नॉर्गे पुरस्कारासाठी नामांकने, प्रस्ताव सादर करण्याचे खेळाडूंना आवाहन

**अलिबाग : प्रतिनिधी**

केंद्र शासनाच्या युवा कार्यक्रम व खेळ मंत्रालयाने सन २०२२मधील तेनझिंग नॉर्गे राष्ट्रीय साहसी पुरस्कार वितरित करण्याकरिता नामांकनाचे प्रस्ताव पाठविण्याबाबत सूचना दिल्या आहेत.

तेनझिंग नॉर्गे राष्ट्रीय साहसी पुरस्कार सन २०२२करिता केंद्र शासनास शिफारस करण्यासाठी नामांकन सादर करणाऱ्या खेळाडूंची कामगिरी मागील तीन वर्षांमधील म्हणजे सन-२०२०, २०२१, २०२२मधील असणे आवश्यक आहे, साहसी उपक्रम हे जमीन, पाणी व हवेमधील असणे आवश्यक आहे. खेळाडूंची कामगिरी अतिउत्कृष्ट असणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे कागदपत्रे असणे आवश्यक आहेत.

तेनझिंग नॉर्गे राष्ट्रीय साहसी पुरस्कार सन-२०२२करिता प्राप्त होणारी नामांकने, प्रस्ताव १५ जून ते १४ जुलै या कालावधीतच केंद्र शासनाच्या https://awards.gov.in या ऑनलाईन पोर्टलवर स्वीकारण्यात येणार आहेत. त्यानुसार इच्छुक खेळाडूंनी आपले नामांकन, प्रस्ताव संचालनालयाच्या dsysdesk10gmail.com या ई-मेलवर पाठविण्यात यावेत, असे क्रीडा व युवक सेवा सहसंचालक सुधीर मोरे यांनी कळविले आहे.


# राष्ट्रीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धेसाठी महाराष्ट्राचा संघ जाहीर

## व्यंकटेश कोणार, वैभव थोरातचा समावेश

**मुंबई : प्रतिनिधी**

उत्तराखंडमधील काशीपूर येथे ८ ते १३ ऑगस्ट या कालावधीत राष्ट्रीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धा आयोजित करण्यात आली असून या स्पर्धेसाठी महाराष्ट्राचा संघ जाहीर करण्यात आला आहे.

महाराष्ट्राच्या महिला संघामध्ये ४७ किलो गटात काजल भाकरे ठाणे, ५२ किलो गटात कामिनी भोस्ते ठाणे, सुश्मिता देशमुख ठाणे, ५७ किलो गटात सेजल मकवाना मुंबई उपनगर, निवेदिता खारकर मुंबई शहर, ६९ किलो गटात अक्षया शेडगे नवी मुंबई, ७६ किलो गटात जान्हवी सावर्डेकर कोल्हापूर, ८४+ किलो गटात श्रेया बोरडवेकर मुंबई शहर; तर राखीव खेळाडूंमध्ये ४७ किलो गटात हर्षदा गोळे मुंबई उपनगर, ६३ किलो गटात सलोनी मोरे रायगड, ६३ किलो गटात प्रिया कांदळकर मुंबई शहर, ८४ किलो गटात पुर्णिमा शिंदे पुणे, अश्लेषा गुडेकर मुंबई शहर यांचा समावेश आहे.



पुरुष संघात ५९ किलो गटात धर्मेंद्र यादव मुंबई, वैभव थोरात औरंगाबाद, ६६ किलो गटात व्यंकटेश कुमार मुंबई उपनगर, साहिल उतेकर मुंबई शहर, ७४ किलो गटात विजय फासले मुंबई उपनगर, विजय शेलार नवी मुंबई, ८३ किलो गटात निलेश गराटे मुंबई उपनगर, १२० किलो गटात रजत डांगरे ठाणे, तर राखीव खेळाडूंमध्ये ९३ किलो गटात अश्विन सोलंकी मुंबई शहर, १०५ किलो गटात संकेत चव्हाण मुंबई उपनगर व ऋतुराज पाटील कोल्हापूर, १२० किलो गटात अजिंक्य पडवणकर मुंबई शहर, १२०+ किलो गटात सागर मिराशी मुंबई शहर यांचा समावेश आहे.

संघ व्यवस्थापक म्हणून देवदत्त भोईर ठाणे व अरुण पाटकर रायगड आणि संघ प्रशिक्षक म्हणून सूर्यकांत गर्दे मुंबई शहर व अनंत चाळके मुंबई शहर यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

# संधी न मिळाल्याने शिखाला अश्रू अनावर



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

बांगलादेशविरुद्धच्या वन डे आणि टी-२० मालिकेसाठी भारतीय महिला संघाची घोषणा करण्यात आली आहे. शिखा पांडेला दोन्ही फॉरमॅटमध्ये संघात स्थान मिळालेले नाही. तिला याबाबत प्रश्न विचारला असता ती ढसाढसा रडू लागली.

शिखा उजव्या हाताची वेगवान गोलंदाज आहे आणि फलंदाजीत खालच्या ऑर्डरमध्ये उपयुक्त फलंदाजदेखील आहे. तिने महिला प्रीमियर लीग २०२३मध्येदेखील चांगली कामगिरी केली. दिल्ली कॅपिटल्ससाठी सर्वाधिक विकेट्स घेणारी ती गोलंदाज होती आणि तिच्या संघाला अंतिम फेरीत नेण्यात तिची महत्त्वपूर्ण भूमिका होती, परंतु तिला संघातून वगळण्यात आले आहे.

दक्षिण आफ्रिकेत झालेल्या टी-२० विश्वचषकासाठी तिने भारतीय संघात पुनरागमन केले. त्यानंतर तिला बीसीसीआयच्या केंद्रीय करारातून वगळण्यात आले. तिला बांगलादेशविरुद्धच्या संघातूनही डच्चू दिला गेला होता.

---



# विंडीजविरुद्धच्या मालिकेत रिंकू सिंगला वगळल्याने आश्चर्य

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट संघ वेस्ट इंडिज दौऱ्यावर आहे. कसोटी आणि एकदिवसीय मालिकेनंतर ३ ऑगस्टपासून दोन्ही संघांमध्ये टी-२० सामने होणार आहेत. पाच सामन्यांच्या या मालिकेसाठी भारतीय संघाची घोषणा करण्यात आली आहे. आयपीएलमध्ये अप्रतिम कामगिरी करणाऱ्या रिंकू सिंगला या संघात स्थान मिळालेले नाही.

या दौऱ्यासाठी हार्दिक पांड्याच्या नेतृत्वाखाली १५ खेळाडूंचा संघ निवडण्यात आला आहे. यामध्ये निवड समितीने अनेक धक्कादायक निर्णय घेतले आहेत. रिंकू सिंगकडे निवड समितीने दुर्लक्ष केले. तो भारतीय संघाचा भावी फिनिशर मानला जातो. देशांतर्गत क्रिकेटमधील त्याचा रेकॉर्डही मजबूत आहे. यानंतरही संघात स्थान मिळाले नाही. त्यामुळे सर्वांनाच आश्चर्य वाटले आहे.

भारताने जानेवारी-फेब्रुवारीमध्ये न्यूझीलंडविरुद्ध शेवटची टी-२० मालिका खेळली होती. त्या संघात समाविष्ट असलेल्या दीपक हुड्डाला डच्चू देण्यात आला आहे. आयपीएल २०२३मध्ये हुड्डा लखनऊकडून खेळताना पूर्णपणे अपयशी ठरला होता. पृथ्वी शॉदेखील या संघाचा भाग नाही.

# टीम इंडियाने घेतली सर गारफिल्ड सोबर्स यांची भेट



**बार्बाडोस : वृत्तसंस्था**

भारतीय संघ सध्या वेस्ट इंडिजला दौऱ्यावर आहे. या दौऱ्यात टीम इंडिया तिन्ही फॉरमॅटची मालिका खेळणार आहे. या दौऱ्याची सुरुवात १२ जुलैपासून कसोटी सामन्याने होणार आहे. तत्पूर्वी भारतीय संघातील खेळाडूंनी वेस्ट इंडिजचे माजी दिग्गज सर गारफिल्ड सोबर्स यांची भेट घेतली. या भेटीचा व्हिडीओ बीसीसीआयने शेअर केला आहे.

कर्णधार रोहित शर्मा पहिल्यांदा सर गारफिल्ड सोबर्सला भेटताना व्हिडीओमध्ये दिसत आहे. यानंतर प्रशिक्षक राहुल द्रविड आणि कसोटी संघाचा उपकर्णधार अजिंक्य रहाणे दिसतात. यानंतर विराट कोहली पुढे आला व त्याने सोबर्स यांची भेट घेऊन हस्तांदोलन केले. त्यांच्यात संवादही झाला. द्रविडने शुबमन गिलची सोबर्सशी ओळख करून दिली. त्यानंतर वेगवान गोलंदाज शार्दुल ठाकूर व्हिडीत दिसला. शेवटी आर. अश्विन व द्रविडने सोबर्सशी संवाद साधला.


जीवेत् शरदः शतम्!

**सुनील म्हात्रे**

यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा



शुभेच्छुक
रईस शेख, महादेव नाईक

**प्रथम पुण्यस्मरण**



*तुझे असणे सर्व काही होते, आयुष्यातील ते सुंदर पर्व होते,*
*आज सर्व काही असल्याची जाणीव आहे, पण तुझे नसणे, हिच मोठी उणीव आहे.....*

**स. न. वि. वि., आपणांस कळविण्यात येते की, आमची ताई,**
**स्व. इंदूताई घरत** (प्राचार्या-चांगू काना ठाकूर विद्यालय, नवीन पनवेल) **यांचे प्रथम पुण्यस्मरण रविवार दि. 09/07/2023 रोजी करण्याचे योजिले आहे. तरी त्यांच्या पवित्र स्मृतीस भावपुष्पांजली समर्पित करण्यासाठी आपण सर्वांनी उपस्थित राहून आम्हाला उपकृत करावे.**

**कार्यक्रम**

* सकाळी 09.00 वा. :- प्रतिमेचे पूजन
* सकाळी 10.30 वा. :- ह.भ.प. मधुकर महाराज (कुंडेवहाळ) यांचे प्रवचन
* सकाळी 11.00 वा. :- राधाकृष्ण भजन मंडळ ( कुंडेवहाळ ) यांचे भजन, गायक श्री. रमेश गांगरे
* दुपारी 12.00 वा. :- पुष्पवृष्टी
* इतर कार्यक्रम :- बालग्राम महाराष्ट्र पंचदिप संकूल अनाथाश्रम (खांदा कॉलनी) येथे अन्नदान
:- श्री. छत्रपती शिवाजी हायस्कूल रोहिंजण येथे विद्यार्थ्यांना शैक्षणिक पुस्तके वाटप

**आपले नम्र**

श्री. रमेश हरिश्चंद्र घरत — श्री. रविराज रमेश घरत
सौ. ज्योती दत्तात्रेय बडवी — श्रीमती निर्मला परशुराम पाटील
समस्त घरत परिवार

पत्ता:- चांगू काना ठाकूर विद्यालय, नवीन पनवेल, सेक्टर-14, रेल्वे स्टेशनजवळ.

वाढदिवसाचे अभिष्टचिंतन...



पनवेल महापालिकेच्या माजी नगरसेविका

**मोनिका प्रकाश महानवर**

यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!



भाजपा

सौजन्य : संतोषी तुपे (माजी नगरसेविका, पनवेल महापालिका)

वाढदिवसाचे अभिष्टचिंतन...



भाजपा कार्यकर्ते

**निलेश वळंजू**

यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!



भाजपा

सौजन्य : राहुल वाहुळकर


दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com